# किसान संघर्ष

महाराष्ट्र राज्य किसान सभेचे मुखपत्र

वर्ष : ८ । अंक : १ । मार्च–एप्रिल–मे २०२२ । किंमत २० रुपये । पाने ३६

# अभूतपूर्व देशव्यापी शेतकरी संघर्षाचा कॉर्पोरेट धर्मांधतेवर ऐतिहासिक विजय!



# ११ डिसेंबर २०२१ : ऐतिहासिक किसान आंदोलनाचा राज्यभर विजयोत्सव



फोर्ट, मुंबई



गायमुखी-धनपूर, ता. तळोदा, जि. नंदुरबार




नागपूर, जि. नागपूर



नाशिक, जि. नाशिक




माहूर, जि. नांदेड




औरंगाबाद, जि. औरंगाबाद




वणी, जि. यवतमाळ




कराड, जि. सातारा

# २५ डिसेंबर २०२० : किसानविरोधी कायद्यांच्या विरोधातील दिल्लीच्या लढ्यात महाराष्ट्र राज्य किसान सभेचा जोरदार सहभाग



२५ डिसेंबर २०२० : दिल्लीजवळ शहाजहाँपूर बॉर्डरवर पोहोचताना महाराष्ट्र राज्य किसान सभेचा जथ्था



२१ डिसेंबर २०२० : नाशिक ते दिल्ली वाहन जथ्था रवाना होण्यापूर्वी झालेल्या सभेतील शेतकरी–कामगार एकजुटीचे दर्शन



२२ डिसेंबर २०२० : मालेगाव, जिल्हा नाशिक येथील सभेत सर्वपक्षीय एकतेचे दर्शन

# २३-२६ जानेवारी २०२१ : दिल्लीतील शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ भव्य जथ्था आणि मुंबईत विशाल शेतकरी-कामगार महापंचायत









# २७ ऑक्टोबर २०२१ : महाराष्ट्रातील शहीद कलश यात्रेस पुण्याच्या महात्मा फुले वाड्यापासून उत्साही सुरुवात








कार्यक्रमास संबोधित करताना अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे




कार्यक्रमास संबोधित करताना जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाच्या राष्ट्रीय नेत्या मेधा पाटकर




कार्यक्रमास संबोधित करताना अखिल भारतीय किसान सभेचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले




कार्यक्रमास संबोधित करताना सीटूचे नेते अजित अभ्यंकर






# लखीमपूर खेरी येथील शहीद कलश यात्रा
# शेतकरी हुतात्म्यांना राज्यातील विविध जिल्ह्यांत आदरांजली



कालवडे, ता. कराड, जि. सातारा



कोल्हापूर, जि. कोल्हापूर



डफळापूर, जि. सांगली



सोलापूर, जि. सोलापूर



सांगली, जि. सांगली



लातूर, जि. लातूर



पाथरी, जि. परभणी



डिग्रस पौळ, जि. परभणी

# भारतीय शेतकऱ्यांचा ऐतिहासिक वर्गसंघर्ष : एक सिंहावलोकन

**डॉ. अशोक ढवळे**

भारतीय स्वातंत्र्याच्या ७५व्या अमृत महोत्सवी वर्षात, भारताच्या आणि जगाच्याही इतिहासात घडलेला सर्वात विशाल, प्रदीर्घ आणि शक्तिशाली देशव्यापी शेतकरी संघर्ष सुवर्णाक्षरांनी कोरला गेला.

२६ नोव्हेंबर २०२० रोजी राजधानी दिल्लीच्या सीमेवर सुरू झालेला हा अभूतपूर्व शेतकरी संघर्ष तब्बल एक वर्ष आणि पंधरा दिवस शर्थीची झुंज देऊन ११ डिसेंबर २०२१ रोजी जिंकला. कॉर्पोरेट धर्मांधतेच्या प्रतिगामी शक्तींवर त्याने ऐतिहासिक विजय मिळवला. या जबरदस्त संघर्षाची अनेक वैशिष्ट्ये होती.

## नऊ ठळक वैशिष्ट्ये

पहिले, या लढ्याचे नेतृत्व देशातील ५०० हून अधिक किसान संघटनांनी संयुक्त किसान मोर्चाच्या व्यासपीठाखाली एकत्र येऊन केले. यापूर्वी इतकी व्यापक एकजूट कधीही झाली नव्हती. देशाच्या कानाकोपऱ्यातील, विशेषतः दिल्ली जवळील राज्यांतील शेती संबंधित शेतमजुरांपासून ते गरीब, मध्यम आणि अगदी काही श्रीमंत शेतकऱ्यांपर्यंत सर्व कृषीसंबंधित घटक या आंदोलनात सहभागी झाले होते.

दुसरे, कामगार-शेतकरी एकजुटीच्या दृष्टिकोनातून केंद्रीय कामगार संघटनांच्या संयुक्त व्यासपीठाने या आंदोलनाला संपूर्ण व सातत्याने पाठिंबा दिला. यातून कामगार-शेतकरी एकजूट प्रथमच इतकी दृढ झाली. खरं तर या आंदोलनाची सुरुवातच मुळी २६ नोव्हेंबर २०२० रोजी शेतकऱ्यांचे 'चलो दिल्ली'चे आवाहन आणि कामगारांचा एक दिवसाचा देशव्यापी संप अशी संयुक्तपणे झाली. गेल्या वर्षभरात देशभरात लाखो शेतकरी आणि कामगार दिल्लीतील शेतकरी आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अनेकदा रस्त्यावर उतरले.

तिसरे, अश्रूधुराचे नळकांडे, पाण्याच्या तोफा, महामार्गांवर खणलेले खंदक, उभारलेल्या प्रचंड बॅरिकेड्स, लाठीचार्ज, अंदाधुंद अटका, खोट्या पोलीस केसेस, आणि केंद्रीय गृहराज्य मंत्री अजय मिश्रा टेनी तर्फे गाड्या घालून चार शेतकरी आणि एका पत्रकाराला चिरडून ठार मारणे, अशा भाजप सरकारने केलेल्या निर्घृण दडपशाहीवर या आंदोलनाने निर्भीडपणे मात केली. सर्वात लाजिरवाणी बाब म्हणजे या मंत्र्याला खून आणि कारस्थान केल्याच्या आरोपाखाली अटक होऊन तुरुंगाची हवा खायला लावण्याऐवजी त्याला केंद्रीय मंत्रिमंडळात कायम ठेवले गेले! मात्र हा दैदिप्यमान लढा या सर्व दडपशाहीला पुरून उरला. वर्षभरात ७१५ शेतकरी या आंदोलनात शहीद झाले. त्यात तरुण, वयस्कर, स्त्री, पुरुष सर्वांचाच समावेश होता.

चौथे, भाजप-आरएसएसच्या सरकारने सतत खालिस्तानी, नक्षलवादी, माओवादी, राष्ट्रविरोधी, देशद्रोही, चीन आणि पाकिस्तान कडून मदत घेणारे असे निर्लज्ज आरोप लावत या आंदोलनाला बदनाम करण्याचे प्रयत्न केले. खुद्द पंतप्रधानांनी संसदेतल्या आपल्या भाषणात देशाच्या या अन्नदात्यांना 'आंदोलनजीवी', 'परजीवी' अशा शेलक्या उपमा दिल्या. कॉर्पोरेट मालकीच्या मिंध्या 'गोदी' मीडियाने कुठलीही शहानिशा न करता सरकारचे हे सर्व धादांत खोटे आरोप उचलून धरले आणि त्यामुळे ते स्वःतच कमालीचे बदनाम झाले. शेतकऱ्यांचा लढा या सर्व बदनामीच्या विरोधात लढला आणि शौर्याने खंबीरपणे उभा राहिला.

पाचवे, अलिकडच्या काळात भारतावर ओढवलेल्या सर्वात प्राणघातक कोरोना महामारीचा सामना या आंदोलनाने निर्भीडपणे केला. सीएए/एनआरसी/एनपीआर विरुद्धचे देशभर पसरलेले जबरदस्त जनआंदोलन, विशेषतः दिल्लीच्या शाहीन बागेतील महिलांचे तेजस्वी आंदोलन, सरकारने या कोरोना महामारीचे कारण दाखवत चिरडले. शेतकऱ्यांचे आंदोलन मात्र कोरोना काळातच सुरू झाले आणि त्यातील दुसऱ्या विनाशकारी लाटेलाही ते पुरून उरले. महामारीच्या काळात शेतकऱ्यांना कुठलाही प्रतिकार करणे शक्य होणार नाही या भ्रमातून सरकारने त्याच वेळी त्यांच्यावर हे तीन कृषी कायदे लादले. मात्र शेतकऱ्यांनी सरकारचा हा भ्रम धुळीस मिळवला.

सहावे, लाखो शेतकऱ्यांनी राजधानी दिल्लीला तब्बल ३८० दिवस वेढा घातला असतानाही हा संघर्ष दिल्लीत आणि सबंध देशातही अत्यंत शांततापूर्ण आणि लोकशाही मार्गाने पुढे गेला. २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी निघालेल्या लाखोंच्या प्रचंड ट्रॅक्टर रॅलीच्या वेळी भाजपचे केंद्र सरकार, त्याचे पोलीस आणि दलाल यांनी चिथावणी देऊन घडवून आणलेल्या हिंसाचाराच्या गुन्हेगारी कटाचाही या आंदोलनाने यशस्वी मुकाबला केला.

सातवे, हे आंदोलन पूर्णतः धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक राहिले. संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांचा हा संघर्ष धर्म, जात, भाषा, प्रांत,

किसान संघर्ष

**सल्लागार :** एल. बी. धनगर, डॉ. अशोक ढवळे, मा. आ. जे. पी. गावीत, उदयन शर्मा

**संपादक :** किसन गुजर **कार्यकारी संपादक :** डॉ. अजित नवले

**संपादक मंडळ :** यशवंत झाडे, शंकरराव दानव, उमेश देशमुख, डॉ. आर. रामकुमार, संजय ठाकूर, अमोल वाघमारे, विजय पाटील

**प्रसिध्दी स्थळ :** ८, माया बिल्डिंग, पहिला मजला, लोकसहकार नगर, पंचवटी, नाशिक - ४२२ ००३.

फोन : किसन गुजर ९४२०००१९४८, डॉ. अजित नवले ९८२२९९४८९१, विजय पाटील ९८८१३९६३४४

वय आणि लिंग या सर्व भिंती ओलांडून उभा राहिला. सर्व जातीधर्मांचे, सर्व प्रांतांचे, सर्व भाषा बोलणारे शेतकरी या आंदोलनात हिरीरीने सहभागी होते. त्यात स्त्रिया आणि पुरुष, तरुण आणि वृद्ध या सर्वांचाच समावेश होता. या आंदोलनात हजारो महिला व तरुणांची उपस्थिती खरोखरच उल्लेखनीय होती. शेतकऱ्यांच्या संघर्षाच्या या धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक स्वरूपामुळेच सरकारला तो चिरडणे अशक्य झाले.

आठवे, गेल्या वर्षभरात केरळ, तामिळनाडू व पश्चिम बंगालमधील विधानसभा, पंजाब व उत्तर प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्था आणि हिमाचल प्रदेश, हरियाणा व राजस्थानच्या पोटनिवडणुकांमध्ये भाजपला सणसणीत पराभव चाखावा लागला. यातील अखेरच्या पाच राज्यांतील पराभवात शेतकरी आंदोलनाचा मोठा वाटा होता. त्यामुळे उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पंजाबच्या विधानसभा निवडणुकांची भाजपला धास्ती वाटली. संयुक्त किसान मोर्चाने मिशन उत्तर प्रदेश-उत्तराखंडची सुरुवात मुझफ्फरनगर येथे १० लाखांच्या ऐतिहासिक रॅलीने केली.

नववे, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या संघर्षाने मोदी-शहा दुकलीच्या नेतृत्वाखालील भाजपचे केंद्र सरकार आणि अंबानी-अदानी प्रतिनिधित्व करीत असलेली देशीविदेशी कॉर्पोरेट लॉबी यांच्या युतीवर थेट हल्ला चढवला. खरे तर या ऐतिहासिक शेतकरी वर्गसंघर्षाने आपल्या मुख्य मागण्यांद्वारे नवउदारवादी धोरणांवर आणि त्यांस जबाबदार असलेल्या साम्राज्यवादावरच सरळ सरळ हल्ला चढवला. विशेषतः दिल्लीच्या सीमांवर असलेले लाखो शेतकरी या आंदोलनाच्या परिणामी चांगलेच वर्गजागृत झाले. शहीद भगत सिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, अश्फाकउल्ला खान, महात्मा जोतीराव फुले, सावित्रीबाई फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची छायाचित्रे तर अनेक ठिकाणी दिसायची. काही ठिकाणी तर कार्ल मार्क्स, लेनिन आणि चे गव्हेरा सुद्धा दिसायचे!

शेतकऱ्यांच्या ह्या आंदोलनाच्या तीन प्रमुख मागण्या होत्या. पहिली, सप्टेंबर २०२० मध्ये संसदेत लोकशाहीचा खून पाडून केलेले शेतकरीविरोधी, जनविरोधी आणि कॉर्पोरेटधार्जिणे तिन्ही कृषी कायदे रद्द करणे. दुसरी, एकूण उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभावात खरेदी सुनिश्चित करण्यासाठी केंद्रीय कायदा करणे. डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय शेतकरी आयोगाची २००६ सालची ही एक कळीची शिफारस होती. तिसरी, विजेचे खाजगीकरण करून केवळ शेतकऱ्यांच्याच नव्हे तर सर्व जनतेच्या वीजदरांत प्रचंड व सरसकट वाढ करणारे वीज दुरुस्ती विधेयक मागे घेणे.

## नवउदारवादी धोरणांचा क्रूर हल्ला

२०१५च्या शांता कुमार समितीच्या शिफारशींपासून मोदी सरकारच्या धोरणांची दिशा पाहिल्यास हे स्पष्ट होईल की हे तीन कृषी कायदे मूलत: हमीभाव, धान्याची सरकारी खरेदी, अन्न महामंडळाच्या गोदामांतील अन्नधान्याची साठवणूक आणि आपल्या देशातील ८१ कोटी ग्रामीण आणि शहरी नागरिकांची सार्वजनिक वितरण व्यवस्था हे सर्व नष्ट करण्यासाठी होते.

यातून पुढे संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावण्याचा प्रयत्न झालाच असता. २०१५च्या भूसंपादन दुरुस्ती अध्यादेशाद्वारे मोदी सरकारकडून या दिशेने प्रयत्न यापूर्वीच करण्यात आले होते, परंतु किसान सभा हा एक मुख्य घटक असलेल्या 'भूमी अधिकार आंदोलना'च्या नेतृत्वाखाली झालेल्या तीव्र आणि संयुक्त शेतकरी संघर्षामुळे ते हाणून पाडण्यात आले. तथापि, महाराष्ट्रासकट भाजपच्या अनेक राज्य सरकारांनी त्यांच्या विधानसभांद्वारे त्याच दुरुस्त्या केल्या.

आता तर या कृषी कायद्यांद्वारे संपूर्ण कृषीक्षेत्रच देशीविदेशी कॉर्पोरेट लॉबीकडे सोपवून त्यांची संपत्ती आणि नफेखोरी वाढवण्याचा प्रयत्न केला गेला. तीन कृषी कायदे मंजूर केल्याच्या अवघ्या एका आठवड्यानंतर चार श्रम संहिता संसदेत दामटून कामगारवर्गावर असेच हल्ले करण्यात आले. सार्वजनिक क्षेत्राच्या बेपर्वा खाजगीकरणाच्या देशद्रोही धोरणामुळे आणि राष्ट्रीय मुद्रीकरण पाइपलाइनद्वारे भाजप सरकारने आता संपूर्ण देशच विक्रीला काढला आहे.

जे वर्ग आपल्या कठोर परिश्रमातून देशाची संपत्ती निर्माण करतात त्या कामगार आणि शेतकरी वर्गांवरच हे हल्ले चढवण्यात आले. 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने'वरील खर्चात प्रचंड कपात करून शेतमजुरांवर असाच हल्ला केला गेला. हाच कॉर्पोरेट धर्मांधतेचा खरा अर्थ आहे, ज्याचे मुख्य प्रतीक आज नरेंद्र मोदी, अमित शहा, मुकेश अंबानी आणि गौतम अदानी आहेत. आणि ह्याच येऊ घातलेल्या संकटाविरुद्ध शेतकऱ्यांच्या आंदोलनाने एक वर्षाहून अधिक काळ विनातडजोड लढा दिला.

आपल्या देशातील नवउदारवादी धोरणांची सुरुवात १९९१ मध्ये काँग्रेसच्या केंद्र सरकारने केली होती. त्यानंतरच्या सर्व केंद्र सरकारांनी ती पुढे नेली आणि सध्याच्या मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप-आरएसएसच्या राजवटीने तर त्यांना बेफाम गती दिली आहे.

गेल्या ३० वर्षांच्या नवउदारवादी धोरणांमुळे भारतातील कृषी संकट अत्यंत गंभीर झाले आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अखत्यारीतील नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्युरोच्या आकडेवारीनुसार, १९९५ ते २०२० या २५ वर्षांत भारतातील ४ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करण्यास भाग पाडले गेले आहे. त्यातील १ लाखांहून अधिक कर्जबाजारी शेतकऱ्यांना एकट्या मोदी सरकारच्या ७ वर्षात आत्महत्या कराव्या लागल्या आहेत. आपल्या देशातील आदिवासी, दलित आणि मागासलेल्या कुटुंबातील लाखो मुले दरवर्षी उपासमारीने मरण पावतात. जागतिक उपासमारीच्या निर्देशांकात यंदा भारताचा क्रमांक ११६ देशांमध्ये १०१वा लागला आहे. गेल्या वर्षी तो १०७ देशांत ९४वा होता. ही आहेत नवउदारवादी धोरणांची कटु फळे.

## शेतकऱ्यांच्या संघर्षातील अलीकडचे टप्पे

नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजपचे केंद्र सरकार कृषी, उद्योग आणि इतर

सर्व क्षेत्रातील नवउदारवादी धोरणे तीव्र करण्यास सर्वाधिक दोषी आहे, यावर शेतकरी आंदोलनाने भर दिला. भाजपच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारांनी त्याचेच अनुकरण केले आहे.

पण गेल्या सात वर्षांत मोदी सरकारने त्यांच्या उपजीविकेवर केलेल्या या नवउदारवादी हल्ल्याच्या विरोधात शेतकऱ्यांचा प्रतिकार सतत बळकट होत गेला. जसजसे कृषी संकट तीव्र होत गेले, तसतसा शेतकरी आणि शेतमजुरांनी त्याविरोधात जोरदार आवाज उठवला. २०१४ मध्ये मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून शेतकऱ्यांनी केलेली ही प्रमुख आंदोलने पहा:

★ अखिल भारतीय किसान सभेच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या 'भूमी अधिकार आंदोलन' या संयुक्त व्यासपीठाच्या नेतृत्वाखाली भूसंपादन दुरुस्ती अध्यादेशाविरुद्ध २०१५ मध्ये झालेला देशव्यापी शेतकरी संघर्ष, ज्यामुळे मोदी सरकारला अखेर तो अध्यादेश मागे घेणे भाग पडले. नव्याने स्थापन झालेल्या भाजप सरकारचा हा पहिलाच पराभव होता. तोही शेतकऱ्यांनीच घडवून आणला.

★ नोटाबंदीचा क्रूर हल्ला झालेला असतानाही अखिल भारतीय किसान सभेने स्वतंत्रपणे काढलेले चार देशव्यापी वाहन जथ्थे. नोव्हेंबर २०१६ मध्ये दिल्लीत संसदेसमोर हजारो शेतकऱ्यांच्या प्रचंड मोठ्या सभेने त्याची सांगता झाली.

★ कर्जमाफी आणि रास्त हमीभावासाठी २०१७-१८ मध्ये राजस्थान किसान सभेच्या नेतृत्वाखाली झालेला प्रचंड शेतकरी संघर्ष. या संघर्षानंतर एक चांगले कर्जमाफी पॅकेज, वृद्धापकाळ निवृत्ती वेतनात वाढ आणि इतर महत्त्वाच्या मागण्या तत्कालीन भाजप राज्य सरकारकडून मिळवण्यात शेतकरी यशस्वी झाले.

★ महाराष्ट्रात १ ते ११ जून २०१७ दरम्यान सुकाणू समितीच्या नेतृत्वाखाली झालेला ११ दिवसांचा अभूतपूर्व संयुक्त शेतकरी संप आणि ६ ते १२ मार्च २०१८ दरम्यान अखिल भारतीय किसान सभेच्या स्वतंत्र नेतृत्वाखाली नाशिक ते मुंबई असा निघालेला ५० हजार शेतकऱ्यांचा ऐतिहासिक किसान लाँग मार्च. या दोन्हीं आंदोलनांमुळे तत्कालीन भाजप राज्य सरकारकडून मोठे कर्जमाफीचे पॅकेज खेचून घेण्यात शेतकऱ्यांना यश आले, वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणीत प्रगती झाली आणि वृद्धापकाळाच्या निवृत्ती वेतनात वाढ मिळाली.

★ जून २०१७ मध्ये मंदसौर येथे भाजपच्या मध्य प्रदेश राज्य सरकारने केलेल्या क्रूर पोलीस गोळीबारात ६ शेतकरी शहीद झाल्यानंतर अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समितीची (एआयकेएससीसी) स्थापना झाली. अखिल भारतीय किसान सभा त्याच्या प्रमुख घटकांपैकी होती.

★ नोव्हेंबर २०१७ मध्ये एआयकेएससीसी तर्फे दिल्लीत झालेली किसान मुक्ती संसद आणि महिला किसान संसद, ज्यामध्ये देशभरातून हजारो शेतकरी सहभागी झाले होते.

★ एआयकेएससीसीने दोन मुख्य विधेयके व्यापक देशव्यापी विचारविनिमयानंतर तयार केली आणि ऑगस्ट २०१८ मध्ये ती संसदेसमोर ठेवली. त्यापैकी एक होते शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी आणि दुसरे होते रास्त हमीभावासाठी.

★ ९ ऑगस्ट २०१८ रोजी सीटू-किसान सभा-शेतमजूर युनियन यांच्या नेतृत्वाखाली १० लाख श्रमिकांचे जबरदस्त देशव्यापी जेल भरो आंदोलन झाले आणि ५ सप्टेंबर २०१८ रोजी दिल्लीत हजारो लाल झेंडे घेऊन २ लाखांची विशाल कामगार-किसान रॅली निघाली.

★ २९-३० नोव्हेंबर २०१८ रोजी एआयकेएससीसीने दिल्लीत १ लाख शेतकऱ्यांचा विशाल देशव्यापी किसान मुक्ती मोर्चा काढला.

सारांश, दिल्लीतील आताचे किसान आंदोलन अचानक वा उत्स्फूर्तपणे झालेले आंदोलन नव्हते. वर उल्लेख केलेल्या सर्व प्रचंड आंदोलनांचा आणि मोहिमांचा तो परिपाक होता.

गेल्या काही वर्षांमध्ये उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव (सी२ + ५०%) या स्वामिनाथन आयोगाच्या शिफारशीची अंमलबजावणी आणि संपूर्ण कर्जमुक्ती या शेतकऱ्यांच्या दोन प्रमुख मागण्या बनल्या आहेत. मनरेगा अंतर्गत कामाचे दिवस २०० पर्यंत वाढवणे आणि मजुरी ६०० रुपये करणे, शहरी भागात या योजनेचा विस्तार करणे ही देखील एक महत्त्वाची मागणी बनली आहे. नोव्हेंबर २०१८ मध्ये एआयकेएससीसीच्या नेतृत्वाखालील किसान मुक्ती मार्चने भारतातील शेतकरी आणि शेतमजुरांच्या मागण्यांची एक सर्वसमावेशक १९ कलमी सनद स्वीकारली, जी या तीन मूलभूत मागण्यांच्या पलीकडे जाते. ही सनद तयार करण्यात अखिल भारतीय किसान सभेने कळीची भूमिका बजावली.

५ जून २०२० रोजी मोदी सरकारने तीन घृणास्पद कृषी कायदे प्रथम अध्यादेश म्हणून जाहीर केल्यानंतर एआयकेएससीसीने देशभरात मोठ्या प्रमाणावर निषेधाची हाक दिली. पंजाबमधील इतर अनेक किसान संघटनांनीही संघर्ष सुरू केला आणि त्यानंतर किसान सभेसह पंजाबच्या ३२ शेतकरी संघटनांच्या संयुक्त आघाडीची स्थापना झाली. बीकेयू (एकता उग्रहान) या पंजाबमधील बलाढ्य शेतकरी संघटनेने या ३२ संघटनांचा भाग न राहण्याचा निर्णय घेऊन त्याच मुद्द्यांवर स्वत:चा स्वतंत्र संघर्ष सुरू केला. पण नंतर ते देखील संयुक्त किसान मोर्चामध्ये (एसकेएम) सामील झाले.

मोदी राजवटीने जेव्हा संसदीय लोकशाहीची हत्या करून आणि देशाच्या संघराज्यीय तत्त्वावर हल्ला करून सप्टेंबर २०२० मध्ये संसदेच्या माध्यमातून तीन कृषी कायदे घुसवण्याचा प्रयत्न केला (त्याने पुढच्याच आठवड्यात संसदेद्वारे चार श्रम संहिता देखील लागू केल्या), तेव्हा एआयकेएससीसीने देशव्यापी कृतीची घोषणा केली. २५ सप्टेंबर २०२० रोजी देशव्यापी आंदोलन आणि २६ नोव्हेंबर २०२० रोजी 'चलो दिल्ली'ची तिने हाक दिली. २७ ऑक्टोबर २०२० रोजी एआयकेएससीसीने आपल्यात तोपर्यंत सहभागी नसलेल्या पंजाब, हरियाणा आणि इतर राज्यांतील अनेक किसान संघटनांना दिल्लीत एका संयुक्त बैठकीसाठी आमंत्रित केले. या बैठकीतच एसकेएम चा जन्म झाला आणि २६ नोव्हेंबर २०२० पासून एक वर्षभर त्याने शेतकऱ्यांच्या या असामान्य लढ्याचे एकजुटीने

नेतृत्व केले. उत्तर प्रदेशातील बीकेयू (टिकैत) सारख्या संघटना लवकरच या संघर्षात सामील झाल्या

एसकेएममध्ये वैचारिकदृष्ट्या डाव्या, उजव्या आणि मध्यममार्गी संघटना सहभागी आहेत. पण मुद्द्यांवर आधारित संघर्षात त्या सर्व एकत्र आल्या ही खरोखरच अत्यंत स्वागतार्ह घटना होती.

१२ महिन्यांहून अधिक काळ हजारो हजार शेतकऱ्यांनी सिंघू, टिकरी, गाझीपूर, शहाजहांपूर, पलवल आणि मेवात या ६ सीमांवरून राजधानी दिल्लीला वेढा घातला. कडाक्याची थंडी, प्रचंड उष्णता आणि मुसळधार पाऊस या सर्वांचा त्यांनी अत्यंत धैर्याने सामना केला. हा खरोखरच मानवी सहनशक्तीचा एक अतुलनीय पराक्रम होता. या संघर्षाचाच आता अंशतः पण ऐतिहासिक विजय झाला आहे.

## मोदी सरकार का झुकले?

पंतप्रधानांनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने तीन काळे कृषी कायदे रद्द करण्याची एकतर्फी घोषणा १९ नोव्हेंबरला केली. त्याआधी एसकेएमच्या एकाही नेत्याशी संपर्क साधला नाही. केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठकही बोलावली नाही! स्वतः घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक पाच दिवसांनंतर २४ नोव्हेंबरला झाली. पंतप्रधानांनी अचानक केलेली घोषणा अनपेक्षित होती. मात्र, गेल्या तीन महिन्यांत केंद्र सरकारला घ्याव्या लागलेल्या सततच्या बचावात्मक पवित्र्यातून आंदोलनाचा विजय होणार आणि सरकारला माघार घ्यावी लागणार, हे स्पष्ट होते. याची पाच प्रमुख कारणे आहेत.

पहिले कारण, ५ सप्टेंबरला मुझफ्फरनगर येथे झालेली १० लाखांची प्रचंड शेतकरी कामगार महापंचायत. यात सर्वाधिक शेतकरी, शेतमजूर आणि कामगार अर्थातच उत्तर प्रदेशातील होते, पण उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि मध्य प्रदेशातूनही शेतकरी प्रचंड संख्येने आले होते. या महापंचायतीचे वैशिष्ट्य म्हणजे २०१३च्या मुझफ्फरनगर दंगलीत आरएसएस–भाजप–विहिंप यांनी घडवून आणलेल्या धर्मांध दंगलीमुळे जो जातीय सलोखा नष्ट झाला होता, तो या निमित्ताने पुन्हा सांधला गेला.

दुसरे, २७ सप्टेंबरला एसकेएमने दिलेल्या भारत बंदच्या हाकेला मिळालेले जबरदस्त यश. वर्षभर सुरू असलेल्या किसान आंदोलनातील हा तिसरा आणि सर्वाधिक यशस्वी बंद होता. देशभरातून सर्व जाती, धर्म, प्रदेश, भाषांचे लाखो शेतकरी, कामगार, शेतमजूर, कर्मचारी, व्यापारी, महिला, युवा आणि विद्यार्थ्यांनी रस्त्यावर उतरून हे आंदोलन जबरदस्त यशस्वी केले.

तिसरे, उत्तर प्रदेश, पंजाब आणि हरियाणामधील संघर्षाची वाढती धार. पंजाबमध्ये शेतकऱ्यांचा संघर्ष राज्यातील घराघरापर्यंत पोहोचला आहे. हरियाणाचे भाजप–जजप राज्य सरकार सातत्याने करीत असलेली दडपशाही आणि त्याविरुद्ध शेतकऱ्यांनी दिलेला शूर आणि विजयी लढा, हा खरं तर एक अध्यायच आहे. या संघर्षाचे लोण उत्तर प्रदेशातही जोरात पसरले आहे.

चौथे, लखीमपूर खेरी येथे भाजपचे केंद्रीय गृहराज्यमंत्री अजय मिश्रा टेनी यांच्या सांगण्यावरून चार शेतकरी आणि एका पत्रकाराला गाड्यांखाली चिरडून केलेले भयानक आणि घृणास्पद हत्याकांड. यावर ताण म्हणजे पंतप्रधान आणि उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी गुन्हेगारांना दिलेले संरक्षण. त्यामुळे देशभरात संतापाची लाट निर्माण झाली. दसऱ्याच्या दिवशी १५ ऑक्टोबरला लाखो शेतकरी आणि कामगारांनी देशभरात हजारो ठिकाणी भाजपच्या प्रमुख नेत्यांचे पुतळे जाळले. १८ ऑक्टोबर रोजी शेकडो ठिकाणी रेल रोको करण्यात आला. लखीमपूर खेरीतील शहीदांच्या अस्थिकलश यात्रा देशभर फिरल्या.

आणि पाचवा घटक अर्थातच उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि पंजाबमध्ये येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुका होत्या. नुकत्याच झालेल्या पोटनिवडणुकीच्या निकालांमध्ये हिमाचल, हरियाणा आणि राजस्थान या किसान आंदोलनात आघाडीवर असलेल्या राज्यांत भाजपचा दारूण पराभव झाला. पंतप्रधान आणि आरएसएस–भाजप यांना येत्या निवडणुकांमध्ये भेडसावणाऱ्या गंभीर धोक्याची उशिरा का होईना पण जाणीव झाली.

तिन्ही कृषी कायदे रद्द करण्याची घोषणा ही या पाचही तात्कालिक घटकांचा एकत्रित परिणाम होता. याशिवाय अर्थातच वर्षभर चाललेली संयुक्त किसान संघर्षाची महान गाथा. हा शेतकरी आंदोलनाचा ऐतिहासिक विजय आहे आणि तो इतिहासात दीर्घकाळ स्मरणात राहील. गेल्या सात वर्षांच्या कारकिर्दीत मोदींना लाजिरवाणी माघार घेण्यास भाग पडण्याची ही दुसरी वेळ आहे. पहिली घटना २०१५ मध्ये घडली, जेव्हा त्यांना देशव्यापी शेतकरी संघर्षाचा परिणाम म्हणून भूसंपादन कायदा दुरुस्ती अध्यादेश परत घेणे भाग पडले होते.

## एमएसपी का आणि कोणासाठी?

तिन्ही कृषी कायदे रद्द करण्याबरोबरच, शेतकऱ्यांच्या संघर्षाची दुसरी प्रमुख मागणी म्हणजे प्रत्येक शेती उत्पादनाला उत्पादन खर्चाच्या दीडपट (C२ + ५०%) किमान आधारभावाची (एमएसपी) हमी देणारा केंद्रीय कायदा करणे. भारताचे प्रख्यात कृषीतज्ज्ञ डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या अध्यक्षतेखालील राष्ट्रीय किसान आयोगाची ही एक कळीची शिफारस होती.

नवउदारवादी धोरणांच्या १९९५ ते २०२० या गेल्या २५ वर्षांत भारतातील ४ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करण्यास भाग पाडले गेले आहे, हे आता जगजाहीर आहे. यापैकी सुमारे १ लाख शेतकरी आत्महत्या या फक्त मोदी राजवटीतील गेल्या ७ वर्षांत झाल्या आहेत. भारतावर ओढवलेल्या कृषी संकटाचेच हे द्योतक आहे.

वरील दराने योग्य हमीभाव लागू केल्याचा दावा करताना मोदी सरकार साफ खोटे बोलत आहे. त्यात A२ + FL हे सूत्र लागू केले आहे, जे C२ + ५०% पेक्षा खूपच कमी आहे, आणि अशा प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचा ते प्रयत्न करताहेत. २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याच्या ७ वर्षांपूर्वी मोदी सरकारने केलेल्या दिखाऊ घोषणेच्या पूर्ततेला आता फक्त एक महिना उरला आहे. प्रत्यक्ष परिस्थिती अगदीच उलट

आहे. राष्ट्रीय नमुना पाहणीने केलेल्या ताज्या सर्वेक्षणात असे दिसून आले आहे की शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ तर सोडाच पण २०१३ ते २०१९ या काळात प्रथमच घट झाली आहे.

आपल्या देशातील बहुतेक भागांमध्ये केंद्र सरकारने २३ वेगवेगळ्या खरीप आणि रब्बी पिकांसाठी घोषित केलेल्या एमएसपीला काहीही अर्थ नाही, कारण बहुतेक राज्यांमध्ये सरकारी खरेदी होतच नाही. त्यामुळे व्यापारी नेहमीच शेतकऱ्यांकडून एमएसपीपेक्षा खूपच कमी दराने शेतीमाल खरेदी करतात. पंजाब आणि हरियाणामध्येही सरकारी खरेदी प्रामुख्याने धान/भात आणि गहू या पिकांपुरतीच मर्यादित आहे. म्हणून देशभरातील शेतकरी या मागणीवर ठाम आहेत.

नवउदारवादी धोरणांची अंमलबजावणी करणाऱ्या यापूर्वीच्या सर्वच केंद्र सरकारांनी गेल्या तीन दशकांमध्ये कृषी क्षेत्रातील उत्पादन खर्च अनेक पटींनी वाढवला आहे. एक, खतांसारख्या कृषी निविष्ठांवरील सबसिडी कमी करून. दोन, बियाणे, खते आणि कीटकनाशकांच्या निर्मितीमध्ये नफेखोर कॉर्पोरेट्सना प्रोत्साहन देऊन. तीन, डिझेल, पेट्रोल, वीज आणि सिंचनाच्या किमतीत भरघोस वाढ करून. मात्र, शेतकऱ्याला त्याच्या पिकाला मिळणारा भाव त्याच प्रमाणात कधीच वाढला नाही. कृषी अरिष्ट आणि शेतकरी कर्जबाजारीपणाचे मूळ इथे आहे, ज्यामुळे एकीकडे शेतकरी आत्महत्या वाढताहेत आणि दुसरीकडे नाईलाजाने शेतकऱ्याला आपली शेतजमीन विकावी लागतेय.

योग्य पीक विमा संरक्षण नसल्यामुळे गंभीर दुष्काळ, पूर, गारपीट आणि अवकाळी पाऊस यांसारख्या नैसर्गिक आपत्ती कोसळल्या की हे अरिष्ट अधिकच गहिरे होते. पंतप्रधान पीक विमा योजनेत तर पैसा शेतकऱ्यांचा आणि कमाई कॉर्पोरेट विमा कंपन्यांची. त्यामुळे ही योजना विदारक ठरली आहे. मोठ्या प्रमाणावर कर्ज कॉर्पोरेट्सकडे वळवले जात असल्याने शेती क्षेत्राला, विशेषत: लहान आणि मध्यम शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध होतच नाही. जागतिक व्यापार संघटनेच्या आदेशानुसार आणि मुक्त व्यापार करारांअंतर्गत स्वीकारण्यात आलेल्या कृषी आयात-निर्यात धोरणांचाही शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे.

या सर्व कारणांमुळे उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभाव मिळावा यासाठी केंद्रीय कायदा करण्याची मागणी किसान आंदोलनाने केली आहे. केंद्र सरकारने शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी अशीही मागणी किसान आंदोलनाने केली आहे. ती नाकारत असताना, आपल्या मूठभर लाडक्या वशिलेबाज कॉर्पोरेट्सना दरवर्षी लाखो कोटी रुपयांची कर्जमाफी आणि करमाफी देण्यात मात्र केंद्र सरकार कोणतीही कसर सोडत नाही.

## शेतकरी आंदोलनात अखिल भारतीय किसान सभेचे योगदान

अखिल भारतीय किसान सभा ही अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समिती (एआयकेएससीसी) आणि संयुक्त किसान मोर्चा (एसकेएम) यांच्या स्थापने पासूनच त्यात एक महत्त्वाचा घटक होती. नुकत्याच विजयी झालेल्या शेतकरी आंदोलनात सामूहिक निर्णय घेण्यात आणि त्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यात किसान सभेने मोठी भूमिका बजावली. ज्या ज्या वेळी वादग्रस्त मुद्दे समोर आले, त्या त्या वेळी एसकेएममधील ऐक्य मजबूत करण्यासाठी किसान सभेने नेहमीच तत्त्वनिष्ठ भूमिका घेतली. आणि या भूमिकेची इतर संघटनांनीही सकारात्मक नोंद घेतली.

संयुक्त किसान मोर्चात किसान सभेने कामगार-शेतकरी एकजूट उभारण्यात आणि शेतकरी वर्गाचे जनतेच्या इतर घटकांशी ऐक्य मजबूत करण्यासाठी पुढाकार घेतला. परिणामी, मोदी सरकारने लादलेल्या चार श्रम संहिता रद्द करण्याच्या आणि सार्वजनिक क्षेत्राच्या खाजगीकरणाची मोहीम थांबवण्याच्या केंद्रीय कामगार संघटनांच्या मागणीला एसकेएमने जाहीरपणे पाठिंबा दिला. देशव्यापी कृतींत समन्वय साधण्यासाठी या दोन्ही मंचांच्या संयुक्त बैठका घेण्यात आल्या. ऑगस्ट २०२१ मध्ये सिंघू सीमेवर झालेल्या एसकेएम च्या राष्ट्रीय परिषदेत कामगार संघटनांचे नेते, तसेच शेतमजूर, दलित, आदिवासी, महिला, युवा आणि विद्यार्थी संघटनांच्या नेत्यांना आवर्जून आमंत्रित केले गेले आणि त्यांच्या मागण्यांच्या समर्थनार्थ ठराव मंजूर केले गेले. २७ सप्टेंबरच्या भारत बंदला अभूतपूर्व यश मिळवून देण्यासाठी या एकजुटीची खूप मदत झाली.

एसकेएम च्या सर्व संयुक्त राष्ट्रव्यापी कृतींमध्ये सक्रिय भाग घेत असतानाच, काही स्वतंत्र कृती देखील आयोजित केल्या गेल्या. ९ ऑगस्ट २०२१ रोजी 'भारत छोडो दिना'च्या वर्धापनदिनानिमित्त सीटू-किसान सभा-शेतमजूर युनियनने दिलेली देशव्यापी संघर्षाची हाक सर्वात प्रभावी ठरली. या 'भारत बचाव दिना'ने देशभरात लाखो श्रमिकांना रस्त्यावर आणले. तसेच पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशमधील किसान सभेने आपल्या भ्रातृभावी २३ मार्च २०२१ रोजी भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या हौतात्म्य दिनी दिल्लीच्या सीमांवर झाली. वर्षभरात अशा अनेक स्वतंत्र कृती किसान सभेने अनेक राज्यांत देखील केल्या.

दिल्लीच्या आजूबाजूच्या सहाही सीमांवर लक्षणीय उपस्थिती असलेली किसान सभा ही देशातील एकमेव किसान संघटना होती. पंजाब, हरियाणा, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या आघाडीच्या राज्यांमधून किसान सभेने आपले अधिकाधिक कार्यकर्ते आणले होतेच. त्याशिवाय इतरही अनेक राज्यांतील किसान सभेने दिल्लीच्या सीमांवर आपले कार्यकर्ते पाठवण्यात पुढाकार घेतला. त्यात महाराष्ट्र, केरळ, तामिळनाडू, बिहार, पश्चिम बंगाल, गुजरात, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, आसाम, ओडिशा, छत्तीसगड, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू काश्मीर यांचा समावेश होता. याशिवाय, गेल्या सबंध वर्षात एसकेएम ने दिलेल्या प्रत्येक आवाहनाला किसान सभेचे काम असलेल्या सर्व २३ राज्यांनी हजारोंच्या संख्येने शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरवून एसकेएम च्या सर्व घटकांमध्ये निश्चितच आघाडी घेतली.

कोलकाता, मुंबई, आगरतळा, पाटणा, दरभंगा, समस्तीपूर, बेंगळुरू, बेळगाव, हैद्राबाद, विशाखापट्टणम, विजयवाडा, ओंगोल, चेन्नई, तंजावर, कन्याकुमारी, थिरूवरूर, भुवनेश्वर, रांची, तिरुवनंतपुरम,

केरळमधील इतर सर्व जिल्हा केंद्रे आणि हरियाणा, पंजाब, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्य प्रदेश आणि उत्तराखंड या आघाडीच्या राज्यांमधील शेकडो ठिकाणी मोठ्या किसान महापंचायती झाल्या. यांतील काही एसकेएम अथवा एआयकेएससीसीच्या झेंड्याखाली, तर काही किसान सभेने स्वतंत्रपणे आयोजित केल्या. मात्र सर्वच महापंचायतींत किसान सभेचा लक्षणीय सहभाग होता. विशेषतः मुझफ्फरनगर आणि लखनौ या एसकेएम च्या प्रतिष्ठेच्या महापंचायती व इतर अनेक ठिकाणी किसान सभेचा सहभाग प्रभावी होता.

दिल्ली जवळील आघाडीची राज्ये आणि किसान सभेच्या इतर सर्व राज्यांनी या संघर्षात प्रशंसनीय कार्य केले. २४ मार्च २०२० रोजी कोरोनातील पहिला लॉकडाऊन जाहीर झाल्यापासून एक महिन्याच्या आत २३ एप्रिल २०२० पासून देशभरातील किसान सभेचे कार्यकर्ते अखंडपणे रस्त्यावर उतरले होते. २६ नोव्हेंबर २०२० रोजी शेतकऱ्यांचा हा अभूतपूर्व संघर्ष सुरू होताच किसान सभेच्या कार्यक्रमांची मात्रा अर्थातच झपाट्याने वाढली. राष्ट्रीय मुद्यांना जोडून स्थानिक प्रश्नांवरही अनेक राज्यांत संघर्ष उभारले गेले.

कोरोना महामारीच्या गंभीर काळातही अखिल भारतीय किसान सभेची सभासदसंख्या किंचित का असेना पण वाढली. २०१९-२० मध्ये १ कोटी १७ लाख ३२ हजार ७५९ इतकी असलेली सभासदसंख्या २०२०-२१ मध्ये १ कोटी १७ लाख ४१ हजार ५१३ झाली. २०२१-२२ मध्ये त्यात लक्षणीय वाढ होईल यात शंका नाही. या संघर्षादरम्यान किसान सभेच्या केंद्राने हिंदी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये हजारो पुस्तिका काढल्या. त्यांची इतर अनेक भाषांत भाषांतरे झाली. किसान सभेची हिंदी आणि इंग्रजीतील केंद्रीय मुखपत्रे 'किसान संघर्ष' आणि 'पेझंट स्ट्रगल' तसेच अनेक राज्य नियतकालिके वेळोवेळी प्रकाशित झाली आणि त्यांची जबरदस्त विक्री झाली. किसान सभेचे लाखो लाल झेंडे आणि बिल्ले केंद्रातून छापले गेले आणि यांनी आंदोलनावर जबरदस्त प्रभाव टाकला.

रणरणते ऊन, कडाक्याची थंडी आणि मुसळधार पावसाचा सामना करत दिल्लीच्या सीमेवर वर्षभर तळ ठोकून आघाडीच्या राज्यांमध्ये सक्रिय असलेल्या किसान सभेच्या नेत्यांमध्ये पंजाबमधील मेजर सिंग पुन्नेवाल, धरमपाल सिंग सील, बलजित सिंग ग्रेवाल आणि बलदेव सिंग लताला; हरियाणातून इंद्रजित सिंग, सुरेंद्र सिंग, फूल सिंग शेवकंद, सुमित दलाल, विरेंद्र सिंग मलिक आणि श्रद्धानंद सोलंकी; उत्तर प्रदेशातून डी. पी. सिंग, चंद्रपाल सिंग, मुकुट सिंग, भारत सिंग आणि दिगंबर सिंग; राजस्थानमधून आमरा राम, पेमा राम, छगन लाल चौधरी, संजय माधव आणि पवन दुग्गल; आणि मध्य प्रदेशातून बादल सरोज, जसविंदर सिंग, अशोक तिवारी, रामनारायण कुररिया, अखिलेश यादव आणि नीना शर्मा अशी किसान सभेच्या नेत्यांची फौज मैदानात उतरली होती.

याव्यतिरिक्त सीटू, शेतमजूर युनियन, जनवादी महिला संघटना, डीवायएफआय आणि एसएफआयच्या देशभरातील हजारो नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी वर्षभर अथक परिश्रम घेत या आंदोलनाचा आपापल्या राज्यांत विस्तार केला.

या वर्षभरात किसान सभेच्या अखिल भारतीय केंद्राचे कार्य सरचिटणीस हन्नन मोल्ला, अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, कोषाध्यक्ष पी. कृष्णप्रसाद आणि सहसचिव विजू कृष्णन यांनी सामुहिकपणे हाताळले. एन. के. शुक्ला, बादल सरोज आणि के. के. रागेश हे सहसचिवही वेळोवेळी केंद्रात येत होते. या कालावधीत किसान सभेच्या केंद्राच्या तसेच आघाडीच्या राज्यांतील नेत्यांचा समावेश असलेल्या विस्तारित केंद्राच्याही नियमितपणे प्रत्यक्ष अथवा ऑनलाइन बैठका झाल्या. किसान सभेच्या केंद्रातील सर्व कॉम्रेड्स नियमितपणे अनेक राज्यांमधील बैठकांना उपस्थित राहिले आणि देशभरातील अनेक मोठ्या किसान महापंचायतींसह विविध आंदोलनात्मक कृतींमध्ये सहभागी झाले. संघर्षाच्या या आव्हानात्मक काळात किसान सभेचे मध्यवर्ती कार्यालय आणि त्यातील विविधांगी कार्ये सुमित रे, मनोज कुमार आणि निलू श्रीवास्तव यांनी कुशलतेने हाताळली.

एसकेएम च्या ९ सदस्यीय समन्वय समितीमध्ये हन्नन मोल्ला यांचा समावेश आहे. त्यांच्या प्रकृतीच्या कारणास्तव डॉ. अशोक ढवळे आणि पी. कृष्णप्रसाद हे गेले अनेक महिने एसकेएम च्या ९ सदस्यीय समन्वय समितीच्या बैठकांना हजर राहिले. एसकेएम च्या सर्वसाधारण सभांना वरील तिन्ही कॉम्रेड्स, तसेच इंद्रजीत सिंग, मेजर सिंग पुन्नेवाल, सुमित दलाल आणि काही वेळा आमरा राम, विजू कृष्णन तसेच वर उल्लेखिलेल्या पंजाब आणि हरियाणातील इतर काही नेत्यांनी हजेरी लावली. २२ जानेवारी २०२१ पर्यंत केंद्र सरकारशी चर्चेच्या ११ फेऱ्या झालेल्या ४० सदस्यीय गटात हन्नन मोल्ला यांनी किसान सभेचे प्रतिनिधित्व केले. पुढे सरकारने ती चर्चा थांबवली. केंद्र सरकारसोबत प्रलंबित मुद्द्यांवर अंतिम करारावर वाटाघाटी करण्यासाठी स्थापन केलेल्या एसकेएम च्या ५ सदस्यीय समितीत डॉ. अशोक ढवळे यांनी किसान सभेचे प्रतिनिधित्व केले.

## किसान सभा-सीटू-शेतमजूर युनियन यांतील समन्वय

एक स्वागतार्ह वैशिष्ट्य म्हणजे सीटू, शेतमजूर युनियन आणि किसान सभेच्या केंद्रीय नेतृत्वाने गेल्या एका वर्षात आपली रणनीती आखण्यासाठी दिल्लीत अनेक नियमित संयुक्त बैठका घेतल्या. तिन्ही वर्गसंघटनांनी मिळून दोन ऑनलाइन देशव्यापी जाहीर सभा घेतल्या, पहिली ८ मे रोजी आणि दुसरी २४ जून रोजी. आणखी एक ऑनलाइन जाहीर सभा २६ जून रोजी 'सेव्ह डेमोक्रसी फोरम'ने आयोजित केली. या सभेला जवळपास सर्व राज्यांतील आणीबाणी काळात बंदिस्त असलेल्या नेत्यांनी संबोधित केले.

आता सीटू, शेतमजूर युनियन आणि किसान सभेच्या समन्वयाची ही प्रक्रिया पद्धतशीरपणे राज्यांमध्ये नेली जात आहे. २० हून अधिक राज्यांतील तिन्ही वर्गसंघटनांच्या राज्य पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त बैठका त्यांच्या केंद्रीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाल्या आहेत. ९ ऑगस्ट २०२१चा 'भारत बचाव दिन' आणि त्याच्या तयारीसाठी म्हणून २५ जुलै ते ८ ऑगस्ट दरम्यानची देशव्यापी मोहीम

एकत्रितपणे राबवण्यात आली. आता यापुढील २८–२९ मार्च रोजी होणारा देशव्यापी सार्वत्रिक संप आणि ग्रामीण हरताळही याचप्रकारे मोठ्या प्रमाणात यशस्वी होईल.

कामगारवर्ग, सीटूशी संलग्न अनेक युनियन्स, सार्वजनिक क्षेत्रातील अनेक युनियन्स आणि इतर अनेक शुभचिंतकांनी शेतकरी आंदोलनाच्या काळात किसान सभेच्या संघर्ष निधीला दिलेल्या मोठ्या योगदानाचा विशेष आणि प्रशंसनीय उल्लेख केला पाहिजे.

केंद्रात आणि अनेक राज्यांतही जनवादी महिला संघटना–डीवायएफआय–एसएफआय या तिन्ही जनसंघटनांनी आपसात आणि किसान सभा–सीटू–शेतमजूर युनियनच्या सोबतीने या वर्षभर चाललेल्या शेतकरी आंदोलनातील अनेक कृतींत देशभर हजारोंच्या संख्येने सहभाग नोंदवला.

## शेतकरी आंदोलनाचे खरे महत्व

मोदींच्या नेतृत्वाखालील भाजप–आरएसएस सरकारच्या कॉर्पोरेटधार्जिण्या धोरणांचा खरा उद्देश म्हणजे 'आत्मनिर्भरता' या दांभिक घोषणेच्या नावाखाली संपूर्ण देश विकणे हाच आहे. भारतात असे कोणतेही क्षेत्र नाही जे मोदी सरकारने खाजगीकरणासाठी आणि देशीविदेशी कॉर्पोरेट्सना विक्रीसाठी ठेवले नाही – मग ते रेल्वे, विमानसेवा, विमानतळे, बंदरे, खाणी, पोलाद, तेल, सिंचन, ऊर्जा असो, नाहीतर दूरसंचार, बँका, विमा, शिक्षण, आरोग्य आणि अगदी संरक्षण देखील असो. आता शेती आणि जमीन सरकारच्या हिटलिस्टवर आहे. आणि यालाच शेतकरी आंदोलनाने कडवा विरोध केला. तीन कृषी कायदे रद्द करणे हा शेतकऱ्यांचा व जनतेचा गौरवशाली विजय होता आणि धर्मांध कॉर्पोरेट शक्तींचा अपमानजनक पराभव!

अर्थात, रास्त हमी भाव आणि खरेदी यांची कायदेशीर हमी; कृषी निविष्ठांच्या वाढत्या किमतींमध्ये घसघशीत कपात; अतिरिक्त वस्तूंसह सार्वजनिक वितरण प्रणालीचा मोठ्या प्रमाणात विस्तार; वीज दुरुस्ती विधेयक मागे घेणे; शेतकरी–शेतमजुरांची संपूर्ण कर्जमुक्ती; सर्वंकष शेतकरीधार्जिणी पीक विमा योजना; कर्ज, सिंचन आणि वीज सुविधांचा मोठा विस्तार; चार श्रम संहिता रद्द करणे; डिझेल, पेट्रोल, स्वयंपाकाचा गॅस आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या गगनाला भिडलेल्या किमती निम्म्या करणे; मनरेगा अंतर्गत शेतमजुरांचे कामाचे दिवस आणि मजुरी दुप्पट करणे आणि या योजनेचा शहरी भागात विस्तार करणे; नवीन शैक्षणिक धोरण रद्द करणे; आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आमूलाग्र भूमी सुधारणा करणे आणि केंद्र सरकारचे सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण आणि तथाकथित राष्ट्रीय मुद्रीकरण पाइपलाइनद्वारे देशाची विक्री थांबवणे; हे सर्व आणि इतर मुद्दे सतत आणि प्रचंड संघर्ष करून लढवले पाहिजेत.

या ऐतिहासिक शेतकरी आंदोलनाचे खरे महत्त्व म्हणजे आपल्या वैभवशाली स्वातंत्र्यलढ्यापासून कॉर्पोरेट, सरंजामदार आणि साम्राज्यवादी लॉबीचे एजंट म्हणून काम करणाऱ्या आरएसएस–भाजप सरकारच्या विनाशकारी, नवउदारवादी, कॉर्पोरेटधार्जिण्या, धर्मांध, हुकूमशाही, फॅसिस्ट आणि देशद्रोही धोरणांवर त्याने संयुक्तपणे धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक हल्ला चढवला. लाखो शेतकऱ्यांनी केवळ स्वत:साठीच नव्हे, तर समग्र जनतेच्या आणि संपूर्ण देशाच्या रक्षणासाठी, देशाचे सार्वभौमत्व, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, संघराज्य प्रणाली आणि संविधानाच्या रक्षणासाठी केलेला हा देशभक्तीपर लढा होता.

या शेतकरी आंदोलनाच्या विजयामुळे मिळालेल्या प्रेरणादायी बळावर वरील मागण्यांसाठी, सरकारी धोरणे बदलण्यासाठी, आणि प्रत्यक्ष हे सरकारच बदलण्यासाठीचा जनसंघर्ष अधिक ताकदीने, आत्मविश्वासाने आणि दृढनिश्चयाने पुढे नेला जाईल.

एक ऐतिहासिक लढाई आपण जिंकली आहे, पण युद्ध अजून बाकी आहे।

आपण हे युद्ध सुद्धा लढू – आणि जिंकून दाखवू!

★★★

---

**(एक लढाई ...पान १५ वरुन)**

'संधी' म्हणून पहात आहेत. शेतीमालाचे उत्पादन, खरेदी, वाहतूक, साठवणूक, प्रक्रिया, विक्री, आयात व निर्यात या संपूर्ण क्षेत्रात विस्ताराची नियोजनबद्ध आखणी या कंपन्यांनी केली आहे. 'भूके'चा नफा कमविण्यासाठी 'शाश्वत' वापर करण्याकरता या कंपन्यांना देशभरातील अन्न व शेतीमालाच्या साठ्यावर 'निर्णायक मक्तेदारी' हवी आहे. कॉर्पोरेट कंपन्यांनी यासाठी अत्याधुनिक सायलोजच्या रूपात अजस्र गोदामे उभी केली आहेत. शेतीमालाचे बाजारभाव नियंत्रित करण्याबरोबरच देशातील अन्नाची किंमत ठरविण्याची अमर्याद क्षमता यातून या कंपन्यांकडे येणार आहे. देशवासीयांवर अन्न गुलामगिरी लादण्याची ही पूर्व तयारी आहे. अन्न गुलामगिरी लादण्यासाठी उभारण्यात आलेली कंपन्यांची गोदामे अन्नधान्यांनी भरून देण्यासाठी करण्यात आलेले कायदे बरोबरच होते असे देशाच्या पंतप्रधानांना वाटते आहे. देशवासियांसाठी ही चिंतेची बाब आहे. लढाई अजून संपलेली नाही हेच यातून स्पष्ट होते आहे. त्यामुळे अन्न गुलामगिरी लादण्याच्या नफेखोर षडयंत्रा विरुद्धची लढाई पुढेही आपल्याला सुरूच ठेवावी लागणार आहे. दीडपट आधारभाव, कर्जमुक्ती आणि शेतकरी केंद्री कृषी धोरणांसाठीचा संघर्षही सुरूच राहणार आहे. शेतकरी, कामगार, श्रमिक, कष्टकऱ्यांचा शोषण, अन्याय आणि विषमते विरुद्धचा लढाही सुरूच राहणार आहे. दिल्लीतील शेतकरी आंदोलनाने या लढ्यांना जबरदस्त उर्जा दिली आहे. सत्य, अहिंसा, लोकशाही आणि विवेकाच्या मार्गाने जनआंदोलने यशाकडे झेपावतात हा दिशादर्शक विश्वासही दिला आहे. दिल्लीतील शेतकरी आंदोलनाचे हे बहुमोल असे फलित आहे.

★★★

# एक लढाई ‘जिंकलेली’

डॉ. अजित नवले

केंद्र सरकारचे कॉर्पोरेटधार्जिणे मनसुबे उधळून लावत दिल्लीतील देशव्यापी शेतकरी आंदोलनाने जबरदस्त विजय मिळविला आहे. शेतीचे सबंध क्षेत्र देशवासियांची अमाप लूट करून, अमर्याद नफे कमविण्यासाठी कॉर्पोरेट कंपन्यांना बहाल करण्याच्या कारस्थानांना या आंदोलनामुळे मोठी चपराक बसली आहे. तीन कृषी कायदे रद्द केले जाणार नाहीत अशी ‘रक्तरंजित’ दुराग्रही भूमिका घेणाऱ्या केंद्र सरकारला आंदोलनाचा परिणाम म्हणून हे कायदे रद्द करणे भाग पडले आहे. आधारभावाच्या मागणीसाठी समिती गठीत करावी लागली आहे. आंदोलनात शहीद झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना योग्य नुकसानभरपाई देण्याचे मान्य करावे लागले आहे. गेल्या वर्षभरात देशातील १ लाखाहून अधिक आंदोलकांवर केलेल्या केसेस मागे घेण्याची घोषणा करावी लागली आहे. शिवाय जाचक प्रदूषण कायदा व वीज विधेयकाबाबत शेतकऱ्यांवर अन्याय न करण्याचे लेखी आश्वासनही द्यावे लागले आहे. या सर्व मागण्या मान्य करून घेण्याच्या पातळीवर हे आंदोलन यशस्वी झाले आहेच. शिवाय मागण्यांच्या पलीकडे इतरही अनेक मौल्यवान उपलब्धी आंदोलनाने प्राप्त केल्या आहेत.

## लोकशाहीची लढाई

सत्तेवर आल्यानंतर संसदेच्या पायरीवर डोके टेकवीत लोकशाहीच्या रक्षणाची ग्वाही देणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या कार्यकाळात लोकशाहीला अनेकदा धाब्यावर बसविले. नोटबंदी, जी.एस.टी., लॉकडाऊनसारखे निर्णय घेताना ‘हम करे सो कायदा’ याच पद्धतीने निर्णय घेतले. आपल्या या तानाशाही कार्यपद्धतीमुळे देशवासियांची रोजी रोटी आणि देशाची अर्थव्यवस्था विनाशाच्या कडेलोटावर पोहचवली. कोविड महामारीचा मुकाबला करतानाही लसीकरण, वैद्यकीय सुविधांऐवजी टाळया आणि थाळ्या वाजविण्यात आल्या. देशवासियांचे असंख्य मृतदेह आपल्याला यामुळे गंगेच्या पाण्यावर तरंगताना पहावे लागले. देशभरात लाखो प्रियजन आपण गमावले. तानाशाही व मागास विचार प्रवृत्तींमुळे देश कोविड काळात मृत्यूच्या वेदनादायी खाईत लोटला गेला.

कृषी कायदे आणतानाही याच तानाशाही कार्यपध्दतीचा अनुभव आपण घेतला. कृषी कायद्यांचे अध्यादेश आणताना लॉकडाऊनचा मुहूर्त साधला गेला. देशवासीय घरात कैद असल्याने ‘प्रतिकार’ होणार नाही याची खात्री बाळगून या काळात हे अध्यादेश आणले गेले. संसदेत कायदे मंजूर करताना सभागृहात चर्चा होणार नाही याची खबरदारी घेतली गेली. राज्यसभेत तर सरळ दांडगाईच करण्यात आली. मंत्रिमंडळ, संसद, राज्यघटना आणि लोकशाही आपल्यापुढे ‘क:पदार्थ’आहेत अशा आत्मगर्विष्ठ व विनाशकारी कार्यपध्दतीची भयानक किंमत देशवासियांना मोदींच्या कार्यकाळात वेळोवेळी मोजावी लागली. चर्चा, विचारविनिमय, सामुहिक शहाणपण आणि संसदीय लोकहितकारी परंपरा गैरलागू ठरविल्यामुळे देशाचे सर्वच क्षेत्रांमध्ये अतोनात नुकसान झाले. मात्र असे प्रचंड नुकसान होऊनही या कार्यपद्धतीला विरोधाची पुरेशी चपराक मिळत नव्हती.

पाशवी बहुमत, अमर्याद सत्ता, सरकारी यंत्रणांचा दुरुपयोग, धर्मांध ध्रुवीकरण, हिंसा आणि प्रसंगी कोणत्याही पातळीवर जात विरोध मोडून काढण्याची कार्यपध्दती वापरून सर्व विरोध मोडून काढले जात होते. लोकशाही वाचविण्याबाबतची हतबलता यामुळे सर्वत्र मूळ धरू लागली होती. शेतकरी आंदोलनाने ही हतबलता उधळून लावत लोकशाही रक्षणासाठी झटणाऱ्या सर्वांमध्ये चैतन्य निर्माण केले. पाशवी बहुमत असणारांनाही झुकविता येते हा विश्वास या आंदोलनाने दृढ केला. लोकशाहीची हत्या करून आणलेले कृषी कायदे शेतकऱ्यांनी लोकशाही अधिकारांचाच वापर करत परत पाठविले. तानाशाही कार्यपद्धत या देशातील शेतकरी, श्रमिक सहन करणार नाहीत असा दमदार संदेश या आंदोलनाने दिला. लोकशाही रक्षणाची लढाई मजबूत केली.

## संवाद नव्हे दडपशाही

लोकशाही प्रक्रियेत संवाद व आंदोलनांचे विशेष महत्व असते. संसदेला आणि सरकारला जनतेचे प्रश्न, मते आणि विरोध लक्षात यावा यासाठी आंदोलने आवश्यक असतात. डॉ. राम मनोहर लोहिया यांनी म्हटल्याप्रमाणे रस्ते ‘खामोश’ झाले तर संसद ‘आवारा’ होण्याचा धोका असतो. संसद आवारा होऊ नये यासाठी आंदोलने आवश्यक असतात. नरेंद्र मोदी सरकारने मात्र आपल्या कार्यकाळात आपला अजेंडा पुढे रेटण्यासाठी रस्त्यांवर ‘खामोशी’ राहील याची कठोर व्यवस्था केली. यातूनच रोहित वेमुला, जे.एन.यु. आणि नागरिकता आंदोलन मोडून काढण्यात आले. आंदोलने मोडून काढण्याची एक ‘प्रक्रिया पद्धतच’ या काळात विकसित करण्यात आली. आंदोलकांना देशद्रोही, नक्षलवादी, आतंकवादी, पाकिस्तानी म्हणत बदनाम करायचे. मग बदनाम केलेले आंदोलन हिंसेचा, दंगलींचा अवलंब करत मोडून काढायचे. आंदोलने मोडून काढण्याची ही पद्धत लोकशाहीसाठी अत्यंत धोक्याचा इशारा ठरू पहात होती. शेतकरी आंदोलन याच मार्गाने मोडीत काढण्याचा चंग बांधण्यात आला होता.

दिल्लीच्या सीमांपर्यंत शेतकरी पोहचू नयेत यासाठी रस्त्यांमध्ये जे.सी.बी. लावून खंदक खोदण्यात आले होते. शत्रु राष्ट्रांच्या फौजेला रोखण्यासाठी उभारावेत असे बॅरिकेड्स उभारण्यात आले. रस्त्यांमध्ये टोकदार खिळे ठोकण्यात आले. भाजप शासित राज्यांमध्ये पोलीस बळाचा वापर करण्यात आला. अश्रुधुराचा मारा करण्यात आला. लाठीचार्ज करण्यात आला. उत्तर भारतातील अत्यंत कडाक्याच्या थंडीत शेतकऱ्यांवर थंड पाण्याचे वेगवान फवारे मारण्यात आले. शेतकऱ्यांची डोकी फोडून त्यांना रक्तबंबाळ करण्यात आले. आंदोलन बदनाम करून मोडून काढण्यासाठी, हे आंदोलन शेतकऱ्यांचे नसून खलिस्तानवाद्यांचे आहे, आंदोलनात नक्षलवादी घुसले आहेत, आंदोलनाला पाकिस्तान आणि चीनची फूस आहे अशाप्रकारे जोरदार अपप्रचार

करण्यात आला होता. संयुक्त किसान मोर्चाने या सर्व आक्रमणांना संयम, अहिंसा व लोकशाही मूल्यांच्या बळावर यशस्वीरित्या परतवून लावले. आंदोलने चिरडून टाकण्याची 'साखळी', तोडून मोडून टाकली. न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या सर्वांमध्ये मोठी उमेद निर्माण केली. मागण्या मान्य करून घेण्याबरोबरच अन्यायाचा प्रतिकार करत आंदोलकांनी मिळविलेली ही 'विजयी उमेद' नक्कीच मौल्यवान होती.

## अहिंसा

शेतकरी आंदोलन मोडून काढण्यासाठीही हिंसेचा वापर केला गेला. हरियाणाचे मुख्यमंत्री श्री. मनोहरलाल खट्टर यांनी भाजप कार्यकर्त्यांना हातात काठ्या घेऊन शेतकऱ्यांना फोडून काढा असे उघड मार्गदर्शनच केले. उत्तरप्रदेशमधील लखिमपुर येथे आंदोलन करून शांततेच्या मार्गाने परतत असणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्रीय गृहराज्यमंत्री अजयकुमार टेनी यांच्या मुलाचा समावेश असणाऱ्या वाहन ताफ्याने अत्यंत निर्दयीरित्या चिरडून काढले. चार शेतकरी व एका पत्रकाराचा या निर्दयी घटनेत जीव गेला. बारा शेतकरी जायबंदी झाले. वर्षभर चाललेल्या आंदोलनात ७५० शेतकरी शहीद झाले. असे असले तरी सरकार पुरस्कृत हिंसेला शेतकऱ्यांनी शांतता आणि अहिंसेच्या मार्गानेच उत्तर दिले. लाखोंच्या संख्येने ३७८ दिवस दिल्लीच्या सीमांवर वेढा देत बसलेल्या आंदोलकांनी कधीही शांतता आणि अहिंसेचा मार्ग सोडला नाही. हिंसेचा पराभव बहाद्दर शेतकऱ्यांनी अहिंसेने करून दाखविला.

## प्रतीकांची लढाई

दिल्लीतील भाजपप्रणित नरेंद्र मोदी सरकारने आंदोलन मोडीत काढण्यासाठी तिरंगा व लाल किल्ला या देशवासियांना प्रिय असलेल्या प्रतीकांचा नेहमीप्रमाणे शस्त्र म्हणून गैरवापर केला. भाजपशी सलगी असणाऱ्या दीप सिद्धू या अभिनेत्याचा व आंदोलनात पद्धतशीररीत्या घुसवण्यात आलेल्या एका शेतकरी गटाचा वापर करून २६ जानेवारी २०२१ रोजीच्या किसान ट्रॅक्टर रॅलीला हिंसक वळण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. संयुक्त किसान मोर्चाने २६ जानेवारी रोजी पोलिसांनी आखून दिलेल्या मार्गावर लाखो शेतकऱ्यांचा समावेश असलेली ट्रॅक्टर रॅली आयोजित केली होती. ही रॅली अत्यंत शांततेत पार पडली. मात्र भाजपच्या हस्तक असणाऱ्या दीप सिद्धू व एका शेतकरी गटाने ठरवून दिलेल्या मार्गा ऐवजी दुसऱ्याच मार्गाने लाल किल्ल्याच्या दिशेने कूच केले. अत्यंत कडेकोट बंदोबस्त असूनही प्रसारमाध्यमांसह ते लाल किल्ल्यात सुखरूप पोहचतील अशी व्यवस्था सत्ताधाऱ्यांकडून करण्यात आली. नंतर आंदोलकांना देशद्रोही म्हणून बदनाम करण्याच्या हेतूने, आंदोलक शेतकऱ्यांनीच लाल किल्ल्यावर हल्ला केला असा अत्यंत खोटा व बदनामीकारक प्रचार करण्यात आला. संयुक्त किसान मोर्चाच्या परिपक्व नेतृत्वाने हा प्रसंगही अत्यंत संयमाने व हुशारीने हाताळला. देशाची माती कसणारे शेतकरी, स्वातंत्र्यासाठी सर्वाधिक बलिदान देणारे समाजविभाग आणि युद्धांमध्ये सर्वाधिक शहादत देणारे जनसमूह 'देशद्रोही' म्हणून बदनाम करता येत नसतात. उलट असा नतद्रष्टपणा करणारेच यात उघडे पडतात. शेतकरी आंदोलनाने ही बाब सिद्ध केली.

## लोकशाही मूल्य

सरकार लोकशाहीची सर्रास पायमल्ली करत असताना संयुक्त किसान मोर्चाने मात्र आंदोलनाच्या निमित्ताने अंतर्गत लोकशाहीचा संकट, कृषी धोरण आणि राजकारणाबाबत अनेक मुद्यांवर विभिन्न मते बाळगणाऱ्या या संघटना प्रदीर्घकाळ एकत्र आंदोलन चालवतील यावर सुरुवातीला अनेकांचा विश्वास बसत नव्हता. संयुक्त किसान मोर्चाच्या अनुभवी नेत्यांनी मात्र ही किमया करून दाखविली. अत्यंत अल्प काळात या नेत्यांनी संयुक्त किसान मोर्चाच्या अंतर्गत विविध पातळ्यांवर कमिट्या करून सर्व संघटनांची मते विचारात घेण्याची पद्धत विकसित केली. विविध विचारांच्या संघटनांना एकत्र ठेवण्यात यामुळे यश आलेच, शिवाय निर्णय अधिकाधिक अचूक होतील यासाठीही या अंतर्गत लोकशाहीचा उपयोग झाला. दिल्लीच्या यशस्वी आंदोलनानंतर पुढेही शेतकऱ्यांसाठी एकत्र काम करण्यासाठी या लोकशाही अनुभवाचा उपयोग होईल. लोकशाही मूल्यांवरील विश्वासही यामुळे बळकट होईल.

## निवडणुका एक शस्त्र

लोकशाही व्यवस्थेत निवडणुकांना अनन्यसाधारण महत्व असते. संयुक्त किसान मोर्चाने आंदोलन यशस्वी करण्यासाठी मतदान व निवडणुकांचाही योग्य वापर करून घेतला. आंदोलन प्रभावी करण्यासाठी मोर्चाने निवडणुकांमध्ये भाजप व मित्र पक्षांना एकटे पाडण्याची रणनीती अंमलात आणली. उन्मत्त राज्यकर्ते सत्ता गमावण्याला नेहमीच घाबरत असतात. संयुक्त किसान मोर्चाने ही बाब लक्षात घेत पंजाबमध्ये भाजपला राजकीयदृष्ट्या एकाकी पाडले. परिणामी अकाली दलाने भाजपपासून फारकत घेतली. केंद्रीय मंत्र्यांनी राजीनामे दिले. बंगालमध्येही निवडणूक प्रचारात भूमिका निभावण्यात आली. मिशन उत्तरप्रदेश अंतर्गत लाखोंच्या किसान पंचायती आयोजित करण्यात आल्या. भाजपच्या मंत्र्यांना काळे झेंडे दाखविण्याची मोठी मोहीम उभारण्यात आली. निवडणुकांमध्ये भाजपला याची मोठी किंमत मोजावी लागेल असे वातावरण यातून निर्माण झाले. संयुक्त किसान मोर्चाच्या या रणनीतीचा आंदोलन यशस्वी करण्यासाठी मोठा उपयोग झाला. लोकशाही व्यवस्थेत निवडणुका किती प्रभावी हत्यार आहेत हे यातून अधोरेखित झाले.

## संघर्ष अजून संपलेला नाही

केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने कायदे मागे घेण्याची केलेली घोषणा शेतकरी आंदोलनाचा नक्कीच विजय आहे. मात्र 'कायदे' मागे घेतले गेले असले तरी 'धोरण' मागे घेण्यात आलेले नाही. कायदे मागे घेताना, ''कायदे योग्यच होते, पण 'काही' शेतकऱ्यांना आम्ही हे समजावून सांगू शकलो नाही'' असे पंतप्रधान म्हणाले आहेत. इतकेच नव्हे तर इतके 'चांगले' कायदे मागे घ्यावे लागले म्हणून त्यांनी देशवासियांची माफी मागितली आहे. मोदींची ही भूमिका फारच 'भयानक' संघर्षाची सूचना आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कॉर्पोरेट कंपन्यां भारतीय शेतीकडे नफा कमावण्याची

**(पान १३ पहा)**

# एन्. डी. पाटील
# शेवटच्या माणसाचा वाटाड्या, सोबती आणि तत्त्वज्ञही

डॉ. उदय नारकर

''पण त्यांनी कोपर्डीचा मुद्दा घ्यायला नको होता,'' एन. डी. काहीसे व्यथित होऊन म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण मिळालं पाहिजे म्हणून महाराष्ट्रभर मोर्चे निघत होते. कोल्हापुरातही निघाला होता. इतका भव्य, तोही मूक आणि अतिशय शिस्तबद्ध असलेला मोर्चा मी आजवर पाहिला नव्हता. त्याचा नेमका कसा अर्थ लावायचा, हे समजून घेण्यासाठी मी सरांना भेटायला गेलो होतो. शेतीतील अरिष्ट, शासनाचं जनताविरोधी धोरण, बेरोजगारीची समस्या, तरूणांचं कोंडलेलं भवितव्य आर्दीविषयी ते बोललेच. पण या व्यापक प्रश्नात कोपर्डी येथील बलात्काराचा मुद्दा या आंदोलनात घेतला गेल्याचे गावागावात काय परिणाम होऊ शकतात, यानं ते चिंतित होते. सोनई, खर्डा याविषयी हे आंदोलन भूमिका घेत नव्हतं. पण पुढं या आंदोलनानं हा आग्रह रेटला नाही.

मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या वेळी घडलेल्या काही घटना सोडल्या, तर मराठा आणि दलित समाज यांच्यात राज्यात उभी फूट पडलेली नव्हती. गावगाड्यात त्यांचे सर्वसाधारण संबंध सौहार्दाचेच राहिले होते, असं त्यांचं मत होतं. जातिव्यस्थेविषयी त्यांची भूमिका किती निःसंदिग्ध होती, याविषयी कुणीही आक्षेप घेऊ शकत नाही. जिना नसलेल्या जातिव्यवस्थेच्या इमारतीच्या वास्तवावर ते किती प्रखर आवेशानं तुटून पडत असत, हे सर्वज्ञात आहे. मोर्चेकऱ्यांनी सुरवातीला घेतलेला हा प्रश्न कितीही तीव्र असला तरी तो समाजातील 'शेवटच्या' माणसांचा नव्हता, हेच ते सांगू पाहात होते. ''मी करत असलेल्या कृतीनं समाजातील शेवटच्या माणसाला काय लाभ होणार आहे,'' ही महात्मा गांधींची दृष्टी स्वीकारूनच त्यांनी आपला रस्ता निवडला होता. असा शेवटचा माणूस त्यांनी कोणत्याही क्षणी आपल्या नजरेआड होऊ दिला नाही आणि निवडलेल्या रस्त्यावरून ते इतक्या दीर्घ आयुष्यात क्षणभरही



विचलित झाले नाहीत.

सत्ताशिखरावर असताना आणि नसतानाही ते शेवटच्या माणसाच्या संगतीतच राहिले. त्याच्यासाठीच बोलत राहिले, तासनतास. लिहित राहिले, अखंड चाललेल्या एसटीच्या प्रवासात लिहिता येत नाही, याची खंत बाळगत. ते भाषण देत नसत. श्रोत्याशी संभाषण करत. ते रस्त्यावरचे संवादक होते, सॉक्रेटिससारखे. आणि तसेच, सत्यान्वेषी. सत्याशी कसलीच प्रतारणा करायची नसल्यानं अतिशय निर्भीड आणि स्पष्टवक्ते. त्याचा अनुभव मोर्च्यात सहभागी असलेल्या शेतमजुराला येई तसा एन्रॉनसारख्या बहुराष्ट्रीय कंपनीची तळी उचललेल्या शरद पवारांनाही येई. वैयक्तिक, कौटुंबिक पातळीवरचे हेवा वाटावेत, असे हृद्य संबंध असले तरी राजकीय बाबातीत ते उच्चारलेल्या शब्दाचा खणखणीत स्वर मृदू होऊ देत नसत. ते बोलू लागले, की मला बर्नार्ड शॉची आठवण यायची. स्पष्टवक्ता, हजरजबाबी आणि वंचितांविषयी अपार करूणा असलेला. 'ती फुलराणी' ज्यावरून घेतलं आहे, त्या 'पिग्मॅलियन' नाटकाचा नायक म्हणतो, ''मी रस्त्यावरच्या फुलवालीला साम्राज्ञीसारखं नव्हे, तर सम्राज्ञीला फुलवालीसारखं वागवतो.'' राजेराण्यांच्या मुकुटात बंदिस्त केलेलं स्वातंत्र्य आणि मानवी प्रतिष्ठा भारा घेतलेल्या महिलेच्या पायाशी आले पाहिजे, एन्.डीं.ना वाटे.

त्यांचं नाव प्रथम माझ्या कानावर पडलं, १९७१-७२च्या दुष्काळात. १९७१च्या आधीपासून महाराष्ट्राच्या काही भागात दुष्काळ पडला होता. या भयानक दुष्काळाच्या परिणामी जिराईत पट्ट्यातील मोठमोठे शेतमालकही अन्नाला मोताद झाले होते. पिकं करपून गेली होती, विहिरी खडखडीत आटल्या होत्या. तथाकथित प्रतिष्ठितही दुष्काळी कामावर हजेरी लावू लागले होते. शासन मुर्दाडासारखं वागत होतं. प्रशासन कमालीची बेपर्वाई दाखवत होतं.

अन्नधान्याची टंचाई होती. आमचं घर तसं सुखवस्तू असल्यानं घरात मिलोच्या भाकरी असत. शेजारच्या भावकीच्या घरातले सुखडी मिसळलेलं पाणी पिऊन झोपी जात. जनावरांचे तर हाल कुत्रं खात नसे. भुकेल्या शेतकरी, शेतमजुरांनी ६ सप्टेंबर १९७१ रोजी आमच्या गावापासून फार दूर नसलेल्या वैरागच्या शासकीय गोदामावर हजारोंचा मोर्चा काढला. त्यावर पोलिसांनी केलेल्या गोळीबारात एका महिलेसकट आठ शेतकऱ्यांचा बळी घेण्यात आला. त्यानंतर राज्यात सर्वत्रच अशी परिस्थिती पसरू लागली. पुढच्या वर्षभरात दुष्काळ आणखीच तीव्र झाला. स्वस्त धान्य दुकानात धान्याचा ठणठणाट आणि काळ्या बाजाराचा हैदोस याची शासनाला जणू तमाच नव्हती. सरकारी महसुलासाठी आणि इतर देण्यांसाठी सरकार शेतकऱ्यांवर जप्तीच्या नोटिसा बजावू लागलं. कोरड्या पडलेल्या विहिरींवरील पंपाचं बिल पाठवू लागलं. काम मागणाऱ्यांना पुरेसं काम मिळेना आणि तशातच सरकारनं तीन रुपयाची मजुरी अडीच रुपये केली.

१९ ऑक्टोबर १९७२ ला एन्.डीं.च्या नेतृत्वाखाली इस्लामपूरला अतिशय शांतपणे

काढलेल्या मोर्चावर पोलिसांनी निर्घृण गोळीबार केला. त्यात त्यांच्या सुरेश या महाविद्यालयीन पुतण्यासह चारजण ठार झाले. त्यात एक बारातेरा वर्षांचा शाळकरी मुलगाही होता.

एन्.डीं.नी भावविवश न होता, दुष्काळ आणि शेतीचे, मजुरीचे प्रश्न लावून धरले. ते जसा जनतेच्या आर्थिक परिस्थितीचा, सामाजिक दुरवस्थेचा सखोल तपास करीत त्याच जिद्दीनं सर्व कायद्यांचा, न्यायालयीन कामकाजाचा खडानखडा अभ्यास करत. त्यांची दृष्टी स्वातंत्र्य मिळण्याच्या आसपास घडत संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात तीक्ष्ण झाली होती. त्या दृष्टीला महाराष्ट्रातील भयाण दृश्य दिसत होतं. त्यांनी अन्यायी राजवटीचे वाभाडे काढताना दिलेली आकडेवारी 'समाजवादाचा पाळणा' हलवायच्या आणाभाका घेतलेल्या महाराष्ट्राला शरमेनं मान खाली घालायला लावणारी होती: १ मे १९६७ ते ३१ डिसेंबर १९७२ या पाच वर्षात राज्यात जनतेवर २०५ वेळा गोळीबार करण्यात आला होता, त्यात १५३ लोक ठार आणि ५११ जखमी झाले होते!

स्वातंत्र्यानंतरही ''आहे रे आणि नाही रे'' यांच्यातील भेद संपला नव्हताच तर आणखी तीव्र झाला होता. 'डबोलेवाले आणि घमेलेवाले' यांच्यातील संघर्ष अटळ आहे, हा त्यांनी आधीच काढलेला निष्कर्ष वरचेवर येत असलेल्या अनुभवानं आणखी बळकट झाला होता. या अनुभवाचं सार काढताना एन्.डी. लिहितात,

''ज्या समाजव्यवस्थेत कोणत्याही व्यक्तीला अगर व्यक्तींच्या समूहाला दुसऱ्या व्यक्ती अथवा समूहाची पिळवणूक करण्याची सुतराम संधी मिळणार नाही, अशी वर्गविहीन समाजव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी जगाच्या पाठीवरील फार मोठा लोकसमूह कटिबद्ध झालेला आहे. उत्पादनांच्या साधनांची सामाजिक मालकी प्रस्थापित केल्याखेरीज आज भांडवलशाही समाजव्यवस्थेत आढळून येणारे वर्गविरोध आणि विरोधाभास नष्ट होऊ शकत नाहीत आणि ते नष्ट झाल्याखेरीज शांततामय स्वराज्याचा लाभही सामान्य जनतेला मिळू शकणार नाही... अहिंसक स्वराज्याची गुरूकिल्ली दुसरी तिसरी कोणती नसून आर्थिक समता हीच आहे.''

हा निष्कर्ष त्यांनी काढला होता महात्मा फुले, कार्ल मार्क्स, शाहू महाराज, लेनिन, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. आंबेडकर यांच्या विचाराची कास घट्ट पकडल्यानं. या विचाराशी त्यांची अव्यभिचारी निष्ठा होती. म. गांधीच्या सत्याग्रहाच्या लढ्याचं त्यांना मोठं आकर्षण असल्यानं त्यांनी आपल्या सर्व लढ्यांत हिंसेला कधीच थारा दिला नाही. सैद्धांतिक स्तरावरही त्यांनी हिंसेचं समर्थन केलं नाही. म्हणूनच नक्षलवादी चळवळ ऐन भरात असताना एन्.डीं.नी राजकीय हिंसेबाबत निःसंदिग्ध भूमिका घेतली. ते लिहितात, ''तुमच्यापेक्षा सरकारची दमनशक्ती अधिक आहे... अजूनही माझा विश्वास संख्याबळावरच आहे.''

या साऱ्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारला राज्यात रोजगार हमीचा कायदा करावा लागला. डाव्या पक्षांनी आणि डाव्या विचारवंतांनी देशाला दिलेली ही देणगी आहे. तो कायदा करण्यासाठी दाजिबा देसाई, उद्धवराव पाटील, गणपतराव देशमुख यांच्यासह डांगे, रणदिवे, बर्धन, गोदुताई, अहिल्याताई, एसेम या साऱ्यांनी आपलं वैचारिक आणि संघटनात्मक बळ सज्ज ठेवलं. लुटारू भांडवलशाही वरचेवर कंगाल करत असताना, तिच्या चौकटीतही जनतेला संरक्षण देणारे कायदे करता येतात, ही वाट त्यांनी आणि डाव्या चळवळीने दाखवली. त्याचाच विस्तार पुढं देशपातळीवरील 'मनरेगा'त झाला. अर्थात, त्यातील त्रुटींविषयीही एन्.डी. अतिशय कडवटपणे बोलत असत.

शेतकरी कामगार पक्षाचे बहुसंख्य नेते शेतकरी होते. पण तो कामगारांचाही पक्ष होता. त्या पक्षाची स्थापना होताना स्वीकारण्यात आलेल्या दाभाडी प्रबंधात मार्क्सवाद-लेनिनवाद स्वीकारण्यात आला होता. यशवंतराव चव्हाणांच्या पुढाकारानं डावी चळवळ, आणि विशेषतः ग्रामीण भागात मजबूत पाया असलेला शेकाप, खिळखिळी करण्यासाठी मोहीमच उघडण्यात आली होती, आणि त्या मोहिमेला काही यशही आलं. केशवराव जेधे, शंकरराव मोरे आणि तुळशीदास जाधव यांच्यासारखे शेकापचे संस्थापक धुरीणच काँग्रेसमध्ये सामील झाले होते. अशा काळात रयत शिक्षण संस्थेची मोठी जबाबदारी असतानाही दाजिबा देसाईंच्या सल्ल्यानुसार एन्.डी. भांडवलशाहीची राजधानी असलेल्या मुंबईत गिरणी कामगारांना संघटित करण्यास गेले. कम्युनिस्ट, समाजवाद्यांच्या सोबतीनं त्यांनी मुंबई आणि राज्यात इतरत्र कामगारांच्या संघटना बांधण्यास सुरूवात केली. या अनुभवातूनच मुंबईतील गिरणगाव का उध्वस्त झालं याविषयी त्यांनी विचार मांडले आहेत. 'आशियातील कामगारवर्गाचं बिनीचं दल' असणारी गिरणी कामगारांची चळवळ मोडण्याचं कारस्थान गिरणीमालक आणि काँग्रेस पक्ष शिकस्तीनं करत होते. मालकांनी गिरणीत कमावलेला नफा धंद्याच्या बाहेर नेला. गिरण्यांचं आधुनिकीकरण केलं नाही. मुंबईत असलेल्या इंजिनियरिंग, केमिकल उद्योगात कामगारांना वेतनात भरघोस वाढ मिळायची. तशी वाढ देणं गिरण्यांना शक्य नव्हतं. दत्ता सामंतांना त्याची तमा नव्हती.

'जगातील कामगारांनो एक व्हा' म्हणत असताना कामगारांतील प्रादेशिक, जातीय अस्मितांमुळे ते व्यथित होत असत. त्यासाठीच ते कामगार चळवळीनं सामाजिक प्रश्न घेण्याविषयी आग्रही होते. डाव्यांनी अग्रहक्काने सामाजिक प्रश्न घ्यावा म्हणून त्यांनीही सतत पुढाकार घेतला. त्याचं प्रत्यंतर मराठवाडा विद्यापीठ नामांतर, म. फुल्यांची बाळ गांगल यांनी 'सोबत'मधून केलेली बदनामी, 'रिडल्स' प्रकरण, खैरलांजी येथील अत्याचार आणि इतर असंख्य प्रकरणी दिसून आलं.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाच्या ऐन रणधुमाळीत ते मुंबईत होतेच, पण त्यांनी ती चळवळ क्रांतिसिंह नाना पाटील आणि इतरांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण ग्रामीण भागात पसरवण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यामुळे संयुक्त महाराष्ट्र निर्माण होत असताना राज्याच्या कुसाबाहेर राहिलेल्या मराठी माणसाचं नेतृत्वही अखेरपर्यंत त्यांच्याकडेच राहिलं. या लढ्यात सर्व राजकीय नेत्यांच्या कामगिरीहूनही शाहिरांनी केलेल्या योगदानाचं त्यांना मोठं अप्रूप

होतं. ते लिहितात, ''साऱ्या पुढाऱ्यांच्या आग ओकणाऱ्या तोफा धडाधड चालू असतानादेखील जे घडलं नसेल, त्यापेक्षा फार मोठे काम अमर शेखच्या डफाने व अण्णा भाऊंच्या वीरश्रीयुक्त गाण्यांनी त्या काळात झालं.''

याच कालखंडाचा आणखी एक विशेष त्यांनी आज काय करत असलेल्या सर्व डाव्यांच्या, परिवर्तनवाद्यांच्या मार्गदर्शनासाठी सांगून ठेवला आहे. त्यांच्या काळात मध्यमवर्ग कामगार चळवळीला नेतृत्व द्यायला उत्सुक होता, याची आवर्जून नोंद करत ते विचारतात, कामगार चळवळीचं पुढारपण कोण करतं? कामगारवर्गातले थोडे असतात, मध्यमवर्गातले जाणते कार्यकर्ते खरं नेतृत्व करतात. महाराष्ट्रातला उच्चवर्गीय, उच्चवर्णीय इतर क्षेत्रं उपलब्ध असतानाही श्रमिकांच्या चळवळीला जोडून घेत होता, हे त्या काळाचं वैशिष्ट्य होतं. १९८० नंतर, विशेषतः जागतिकीकरणाच्या आक्रमणानंतर हा मध्यमवर्ग फुटला. उदारीकरणाच्या धोरणाचा लाभ होत मध्यमवर्गाचा एक स्तर वरच्या संपन्न स्तरात सामील व्हायची आकांक्षा बाळगू लागला. पण त्यातील मोठी संख्या खालच्या, कनिष्ठ स्तरावर फेकली गेली. व्यक्तिमत्व दुभंगलेला मध्यमवर्ग कामगार चळवळीला नेतृत्व देण्याच्या अवस्थेत राहिला नाही. त्याचा परिणाम विचारावर, राजकीय, सामाजिक, प्रबोधन या चळवळींवर झाला आहे, याची खंत एन्.डीं.ना आयुष्यभर वाटत राहिली.

एन्.डीं. ची कार्यकुशलता खऱ्या अर्थानं पणाला लागली कापूस एकाधिकार खरेदी योजना राबवताना. १९७२ पासून रडतखडत चाललेल्या या योजनेचं गाडं रूळावर आणण्यासाठी त्यांनी विदर्भातील शेतकऱ्यांपासून केंद्रीय अर्थमंत्रालयापर्यंत अहर्निश मेहनत घेतली. ''शेतीमालाच्या बाजारात सरकारने हस्तक्षेप केला पाहिजे'' ही भूमिका सर्वच डाव्या पक्षांनी पहिल्यापासून जोमानं लढवली आहे. या बाबतीत त्यांना सरकार ही आवश्यकता वाटते तर शरद जोशी आणि त्यांच्या आजच्या पाठीराख्यांना सरकार हीच समस्या वाटते. जशी अदानी–अंबानी अशा कॉर्पोरेटशाहीला आज वाटते. शरद जोशींच्या या वैचारिक कमजोरीवर एन्.डीं.नी त्यावेळीच नेमकं बोट ठेवलं होतं, आणि त्याचं प्रत्यंतर आज देशातील सर्वच कृषिव्यवस्थेला येऊ लागलं आहे. एन्.डीं.नी १९७० साली 'शेतीमालाच्या किफायतशीर किमतीची कैफियत' या पुस्तिकेत ही भूमिका जोरकसपणे मांडली. त्यावेळीही बड्या व्यापाऱ्यांची एजंटगिरी करणाऱ्या जनसंघानं त्याला रोगट विरोध केला होता. या विषयी एन्.डी. इतके आग्रही होते, की त्यांनी 'पुलोद'मधील स्वतःचं मंत्रिपद पणाला लावत त्यांच्या पक्षानं सरकारमधून बाहेर पडायची तयारी केली होती. माकपने त्यावेळी त्या सरकारमध्ये समील न होता बाहेरून पाठिंबा दिला होता.

आजच्या कॉर्पोरेटशाहीचं सूतोवाच ८० च्या दशकातच झालं होतं आणि नव्वदीत देशाच्या सरकारनं ते अधिकृत धोरण म्हणून स्वीकारलं. २००२ साली जागतिक बँकेच्या दडपणाखाली कापूस पिकवणाऱ्या शेतकऱ्याचं एकाधिकार खरेदीचं कवच काढून घेण्यात आलं. विदर्भात शेतकरी आत्महत्त्या वाढू लागल्या. आज शेतकरी हमीभावाचा केंद्रीय कायदा करावा म्हणून लढत आहे. तीन काळे कृषि कायदे मागं घेतले तरी अजून हमीभावाचा कायदा करण्यासाठी सरकार काहीही हालचाल करत नाही. एन्.डीं.च्या पुढाकारानं कापूस उत्पादक शेतकऱ्याला १५ ते २२ टक्के दरवाढ, १०० टक्के दराची हमी, नफा झाल्यास बोनस आणि वजनमाप झाल्यानंतर चोवीस तासात रक्कम अशी हमी देण्यात आली. आज सर्व पिकांना हमीभाव देताना या तरतुदी मोठ्या प्रमाणात मार्गदर्शक ठरू शकतात.

देशाच्या सार्वजनिक साधनसंपत्तीवर देशी आणि परदेशी कॉर्पोरेटशाहीचा डोळा असल्याचं ऐंशीच्या दशकापासून उघड होऊ लागलं होतं. एन्रॉन या दिवाळखोर अमेरिकन कंपनीच्या घश्यात महाराष्ट्रातील वीजक्षेत्र घालण्याचा डाव महाराष्ट्र सरकारनं खेळला. पुढं मुंबईजवळ अंबानीच्या रिलायन्स सेझनं शेतकऱ्यांना उध्वस्त करायला सुरवात केली. या दोन्ही लढ्याचे एन्.डी. सेनानी होते, यशस्वी सेनानी होते. या दोन्ही लढ्यांनी कामगारांच्या, शेतकऱ्यांच्या चळवळीला काय धडा घालून दिला ते एन्.डीं.च्या शब्दात समजून घेतलं पाहिजे:

''विधिमंडळात आमचे संख्याबळ नसेल, परंतु विधिमंडळाच्या बाहेर रस्त्यावर आमचे बहुमत आहे. आणि हे रस्त्यावरचे बहुमत विधिमंडळातल्या बहुमताला भारी ठरणारे आहे. एन्रॉन प्रकल्पाविरोधातला लढा सुरू असताना आम्हाला असेच हिणवले जात होते, परंतु आम्ही हिंमत हरलो नाही. रायगड जिल्ह्यातील सेझ प्रकल्पाविरोधातला लढा तर सरकार आणि प्रचंड धनसत्ता अशा दुहेरी शक्तिविरोधात होता. नंतरच्या कोल्हापूरच्या टोलविरोधातला लढाही अशाच पद्धतीने यशस्वी करून दाखवला. विधिमंडळातल्या बहुमतापेक्षा रस्त्यावरचे बहुमत श्रेष्ठ ठरते हे एकदा नव्हे, अनेकदा आम्ही सिद्ध करून दाखवले आहे.''

एन्.डी. समतेच्या संगरात सर्व शोषणाविरुद्ध लढत राहिले. अंधश्रद्धांविरुद्ध लढत राहिले. सनातन वैदिक संस्कृतीविरुद्ध लढत राहिले. देशात हिंदुराष्ट्र लादू पाहणाऱ्या फॅसिस्ट शक्तीशी दोन हात करण्यास तर ते सदैव सिद्ध होते. संसदेपासून रस्त्यापर्यंत ते लढत राहिले. समाजातील शेवटचा माणूस हा त्यांच्या संघर्षयात्रेतला ध्रुवतारा होता. १९७२ च्या इस्लामपूर गोळीबारात हुतात्मा झालेल्या सुरेश या पुतण्याच्या नावाने चाललेल्या पाणी पुरवठा संस्थेत त्यांनी पूर्वश्रमीच्या महारांना, चांभारांना सहभागी करून घेतलं. गावातल्या शेवटच्या माणसाची जमीन सिंचनाखाली आणली. समाज तुमची कठोर तपासणी करत असतो, हे जाणून ते वाट चालत राहिले.

श्रेष्ठ मानवतावादी कम्युनिस्ट कवी ब्रेख्त लेनिनविषयी म्हणाला ते एन्.डीं. नाही लागू पडतं:

*दुबळे लढत नाहीत.*

*थोडं बळ असणारे तासभर लढतात.*

*त्याहून अधिक बळ असणारे लढतात काही वर्षं.*

*बलिष्ठ लढतात आयुष्यभर.*

*ते असतात अजेय.*

★★★

# शेतकरी लढ्याच्या बिनीवर महिला

*मोदी सरकारने लादलेल्या नव्या कृषी कायद्यांच्या विरोधात शेतकऱ्यांनी एल्गार पुकारलेला होता लाखो शेतकरी या लढ्यामध्ये सहभागी होते आणि त्यात महिलांची संख्यादेखील लक्षणीय होती. दिल्लीतील कडाक्याच्या थंडीत या महिला केवळ आंदोलनात सहभागी झालेल्या नाहीत तर आघाडीवर राहून लढ्यातील महत्वाच्या भूमिका बजावत होत्या.*

*'द क्विन्ट', या मुक्त पत्रकारिता समूहाने टिकरी सीमेवर जाऊन या लढ्यातील महिला प्रमुखांशी चर्चा केली. या आंदोलनातील त्यांची भूमिका समजून घेतली. या लढ्यात एवढ्या मोठ्या संख्येने सामील होण्यामागील त्यांची प्रेरणा समजून घेतली, त्याची ही कहाणी.*

६५ वर्षांच्या जसबीर कौर नाट या गेली ३० वर्षे शेतकरी-कामगार आंदोलनातील कार्यकर्त्या आहेत. 'पंजाब किसान सभे'च्या राज्य समितीच्या सदस्य असणाऱ्या जसबीर कौर 'साम्यवादी' म्हणून ओळखल्या जातात. टिकरी सीमेवरील मुख्य मंचापाशी आम्ही त्यांची भेट घेतली. सुकाणू समितीच्या प्रमुख या नात्याने तेथील सभेत बोलणारे वक्ते व जनसमुदाय यांचे नियोजन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. त्या म्हणाल्या, ''शेतकरी लढ्याची नेती असण्याबरोबरच मी साम्यवादी विचारांची देखील आहे आणि १९८६ पासून अनेक संघटनांशी जोडली गेलेली आहे.''



एक संपूर्ण दिवस आम्ही जसबीर कौर यांच्या सानिध्यात घालवला, आणि सर्व काही सुरळीतपणे चालू राहावे याकरता न थकता, अविरतपणे आणि दृढनिश्चयाने काम करणाऱ्या एका महिलेचे दर्शन आम्हाला घडले.

## टिकरी सीमेवरचा सकाळी ७ ते रात्री ९ पर्यंतचा जसबीर कौर यांचा दिवस

जसबीर कौर त्यांच्या संपूर्ण कुटुंबासोबत म्हणजेच पती आणि मुलगी यांच्यासोबत टिकरी सीमेवरील मेट्रोच्या पुलाखालील तंबूमध्ये मुक्कामाला आहेत. सकाळी ७ ला दिवस सुरू झाल्यांनतर ९.३० वाजता त्या मुख्य मंचापाशी येतात आणि मग शेतकरी आंदोलनाचा पुढील कार्यक्रम ठरवण्यासंदर्भात विविध शेतकरी संघटनांच्या नेत्यांबरोबरच्या बैठकांची मालिकाच सुरू होते. ११ च्या सुमारास त्या चर्चापीठाच्या व्यवस्थापनात लक्ष घालतात आणि सर्व शेतकरी संघटनांच्या नेत्यांना बोलण्याची आणि आपली मते मांडण्याची योग्य संधी मिळेल याची दक्षता घेतात.

जसबीर कौर म्हणतात, ''सुकाणू समितीने ठरवल्याप्रमाणे रोजच्या वक्त्यांच्या नोंदी मी माझ्या वहीमध्ये करून ठेवते आणि प्रत्येकाला बोलायला पुरेसा आणि समान वेळ मिळेल याची दक्षता घेणे ही माझी जबाबदारी आहे. त्यानंतर मी निधी संकलनाचे काम देखील बघते. रोजच्या रोज किती निधी जमा झाला आणि किती वापरला गेला, याचा हिशेब ठेवला जातो. पहिल्या दिवसापासून आजपर्यंतचा हिशेब माझ्याकडे आहे.''

सकाळी ९ वाजता चर्चापीठावर गेलेल्या जसबीर कौर संध्याकाळी ४ वाजता त्यांच्या तंबूकडे परततात आणि मग दुपारचे जेवण घेतात आणि लंगर मधील रात्रीच्या जेवणाच्या देखरेखीला लागतात. जसबीर कौर म्हणतात, ''चर्चापीठावरील माझी जबाबदारी संपल्यावर मी लंगर मधील भोजन व्यवस्थेकडे लक्ष घालते, कधी कधी ताटंवाट्या धुण्याचं देखील काम करते.''

## कार्यकर्ता होण्याची प्रक्रिया

आंदोलनातील महिलांच्या सहभागाविषयी बोलतांना जसबीर कौर म्हणतात, ''पंजाब आणि हरियाणा मधील महिला विवादित अशा शेती कायद्यांच्या विरोधात पहिल्यापासूनच आघाडीवर आहेत. त्या पुढे म्हणतात, ''ज्यांना असं वाटत असेल की महिलांना जबरदस्तीने या आंदोलनात सामील व्हायला लावलेलं आहे त्यांनी हे समजून घ्यावं की, शेतीमध्ये महिलांचा सिंहाचा वाटा आहे आणि नवे शेती कायदे व्यवस्थितपणे समजून घेण्यास महिला पूर्णपणे सक्षम आहेत.''

## ९०च्या खालिस्तान दहशतीत बिंदू यांनी त्यांचे वडील गमावले

४३ वर्षाच्या हरिंदर कौर बिंदू, या 'भारतीय किसान युनियन (BKU) एकता च्या उग्रहान' गटाचे काम करतात आणि त्यांचे सहकारी त्यांना 'बिंदू' नावानेच ओळखतात, त्यांच्याशी बोलतात. टिकरी सीमेवरील त्यांचा नित्यक्रम म्हणजे माध्यम समूहांशी बोलणे, संघटनांच्या प्रमुखांकडून आलेले निर्णय व संदेश कार्यकर्त्यांपर्यंत पोचवणे आणि या लढ्याला विविध रूपात मदत करायला आलेल्या घटकांडून मदत स्वीकारणे. ''सकाळी ५ वाजता मी उठते आणि रात्री ११ नंतरच पाठ टेकू शकते'' असे बिंदू यांनी सांगितले.

बालपणाबद्दल बोलताना बिंदू सांगतात, त्यांचे वडील ९ एप्रिल १९९१ मध्ये

खालिस्तानी आतंकवाद्यांशी लढताना शहीद झाले. बिंदू यांच्या घरात कायमच क्रांतिकारी विचारांची चर्चा असे आणि वडिलांच्या शहीदीनंतर बिंदू पूर्णवेळ आंदोलनात सहभागी झाल्या आणि शेतकरी, दलित आणि स्त्रियांच्या हक्कांसाठी कायमपणे झगडत राहिल्या.

## शेतकरी आंदोलनाने दिल्ली सीमेवर बदलल्या स्त्री–पुरुषांच्या पारंपरिक भूमिका

हरिंदर बिंदू यांच्याबरोबर टिकरी सीमेवरील आंदोलनाच्या इथे भेट दिली असता, बिंदू यांनी सांगितले की, आंदोलनांचे नियोजन अत्यंत विचारपूर्वक केलेले आहे. महिला स्वयंपाक–पाणी–साफसफाई यामध्ये अडकून पडणार नाहीत याची काळजी घेतलेली आहे. लढ्यातील या विशिष्ट श्रमविभागणीबद्दल सांगताना बिंदू सांगतात, ''या विषयावर बराच विचार झाला आणि आंदोलनाचे हे प्रारूप निर्माण झाले. साधारणपणे स्वयंपाकघर सांभाळण्याची जबाबदारी घरात महिलांची असते. इथे येऊनपण त्यांना तेच करावे लागले तर आंदोलन त्यांना समतेच्या पातळीवर कसे प्रेरित करेल?''

महिलांच्या शेतकरी ''आंदोलनाबद्दल बोलताना बिंदू पुढे म्हणतात'', नरेंद्र मोदींकरता त्यांचा एक संदेश आहे, ''आम्हाला भाजप सरकारला, जे महिलांना जनावरासमान समजणाऱ्या मनुस्मृतीचे धडे गिरवतात त्यांना एक संदेश द्यायचा आहे. आम्ही त्यांना चांगले खडसावून सांगू इच्छितो की, आम्हा महिलांचा आवाज आणि संघटित होण्याचा आमचा अधिकार दाबायचा प्रयत्न करायचे थांबवा. आम्ही तुम्हाला घाबरून घरात बसणार नाही.''

विद्यार्थी आणि युवक चळवळीशी संलग्न असणारी नवकिरण नाट ही तर अगदीच तरुण कार्यकर्ती. नोव्हेंबर पासून ती शेतकरी आंदोलनाचा भाग बनली. पंजाबची आणि त्यातून शेतकरी कुटुंबातून आलेली असल्याने तिला या शेतकरी आंदोलनापासून लांब राहणं अशक्य होतं. टिकरी सीमेवर नवकिरण आणि तिच्या मित्रमंडळींनी 'ट्रॉली टाईम्स' हे वर्तमानपत्र सुरू केले. जे आता पंजाबी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये प्रकाशित होते आणि दिल्लीच्या सर्व सीमांवर आंदोलनाच्या ठिकाणी त्याचे वितरण केले जाते.

''आमच्या असे लक्षात आले की, संपर्क आणि संदेश देवाणघेवाण यामध्ये अडचण येते आहे. आंदोलनाचे स्वरूप खूप व्यापक असल्याने नेमके कुठे काय सुरू आहे हे सर्व आंदोलनकर्त्यांना समजत नाहीये. मुख्य चर्चापीठावर काय सुरू आहे हे देखील सर्वदूर समजणे कठीण जात आहे. ही अडचण एखादे वर्तमानपत्र सोडवू शकेल असे आम्हाला वाटले आणि त्यातूनच 'ट्रॉली टाईम्स' ची निर्मिती आम्ही सरू केली.''

## काही लढ्यांचे महत्व हे तत्कालीन राजकीय लाभांपेक्षा व्यापक असते

लढ्याच्या ठिकाणच्या श्रमविभागणीबद्दल विशेतः घरगुती कामांच्या वाटणीबद्दल बोलताना नवकिरणने एक मजेदार किस्सा सांगितला, ती म्हणते ''एकदा मी भिंतींवर घोषणा लिहित होते, आणि मला भूक लागली होती. मी आजूबाजूला बघितले तर काही तरुण जेवण बनवत होते. मी तेथे गेले आणि त्यांना सांगितलं, मला भूक लागली आहे. त्यांनी मला त्यांनी बनवलेलं जेवण दिलं आणि माझ्याशी बोलू लागले. त्यातील एक तरुण मला म्हणाला, तो जेव्हा इथे आला, तेव्हा साधी कणिक देखील मळू शकत नव्हता, पण आता एकदम छान, गोल अशा रोट्या त्याला बनवायला यायला लागल्या आहेत.''

शेती आणि एकूण शेतीव्यवहारातील पुरुषसत्ताकतेबद्दल बोलताना नवकिरण म्हणते, सध्या सुरू असलेले हे आंदोलन त्याअर्थाने देखील अत्यंत विलक्षण आहे, जिथे कुठेही लिंगभावावरून कामे ठरवली गेलेली नाहीत.

## 'माध्यमे किंवा राज्यसत्ता आमची कर्त्याची भूमिका हिरावून घेतात तेव्हा वेदना होतात'

टिकरी सीमेवरील ७८३ नंबरच्या पिलरच्या जवळ स्वतःच्या वडिलांच्या शेजारी बसून नवकिरण म्हणते, ती अनेक महिला नेत्यांना बघत मोठी झालेली आहे. तिची स्वत:ची आई गेली ३५ वर्षे ९०च्या दशकापासून समाजातील वंचित आणि शोषित घटकांच्या हक्कांसाठी लढताना तिनं बघितलं आहे.

''माझ्या जन्माच्या वेळी माझे वडील तुरुंगात होते. शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी लढताना ते जवळपास सहा वेळा तुरुंगात जाऊन आले आहेत. तर माझी आई तीन वेळा तुरुंगात जाऊन आली आहे. मला वाटतं, सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांचं विधान हा एक क्रूर विनोद आहे. कारण असंख्य महिला त्याच त्याच प्रश्नांवर वर्षानुवर्षे लढत आल्या आहेत. तेव्हा त्यांना आंदोलनात जबरदस्तीनं ठेवण्यात आलं आहे हे विधान मी कसं मान्य करीन?''

महिला या शेतकरी आंदोलनाच्या केवळ महत्त्वाचाच नव्हे तर कळीचा अंश आहेत. त्या आंदोलनात सहभागी आहेतच, शिवाय त्या मागे राहून घर आणि शेती दोन्ही समर्थपणे सांभाळत आहेत. त्यांची शेती कायद्याविषयी निश्चित मतं आहेत आणि जोवर कायदे रद्द केले जात नाहीत तोवर घरी परतायचं नाही, यावर त्या ठाम आहेत.

**('द क्विन्ट'च्या सौजन्याने)**

**(अनुवाद : रसिया पडळकर)**

# मोदी सरकारच्या किसानविरोधी कायद्यांच्या विरोधातील दिल्ली येथील लढ्यात महाराष्ट्र राज्य किसान सभेचा जोरदार सहभाग

**विजय पाटील**

मोदी-शहाच्या नेतृत्वाखालील भाजपच्या केंद्र सरकारने देशातील शेतकऱ्यांना देशोधडीला लावून शेतीक्षेत्र बडया कॉर्पोरेट भांडवलदारांना प्रदान करणारे तीन कायदे लोकशाहीचे सर्व संकेत झुगारून व घटनेची पायमल्ली करून संसदेत आवाजी मतदानाने मंजूर करून घेतले होते. तसेच प्रस्तावित वीज बिल विधेयक - २०२० आणले आहे. उत्पादन खर्चाच्या दीडपट आधार भावाची आणि त्या दराने शेतीमालाची खरेदी करण्याची हमी देणारा कायदा केंद्र सरकार करण्यास तयार नाही.

या किसानविरोधी धोरणांच्या विरोधात देशात सर्वदूर शेतकऱ्यांसह सर्वसामान्य जनतेत संताप असून देशभर जोरदार निषेध कृती हे कायदे जोपर्यंत मागे घेतले जात नाहीत तोपर्यंत लढण्याची तयारी शेतकऱ्यांनी केली होती. सहा महिने आपल्या राज्यात लढत असलेल्या पंजाबमधील लाखों बहाद्दर शेतकऱ्यांनी या कायद्यांच्या व प्रस्तावित वीज बिलाच्या विरोधात २५ नोव्हेंबरपासून दिल्लीला धडक देण्यासाठी कूच केले होते. अर्थात या मार्गात मोदी-शहाच्या फॅसिस्ट सरकारने खोडा घालण्याचा प्रयत्न केला नसता तरच आश्चर्य होते. आणि त्यांनी आपली ती प्रवृत्ती दाखवलीच. दिल्लीकडे जाणारे सर्व महामार्ग त्यांनी अडवून मोर्चेकऱ्यांना हरियाणाच्या सरहद्दीवरच रोखले. या दडपशाहीवर मात करून शेतकरी पुढे सरसावले तेव्हा त्यांना पुन्हा दिल्लीच्या सीमेवर रोखले. अत्यंत निर्दयपणे प्रचंड थंडी असतानाही पाण्याचे फवारे मोर्चेकऱ्यांवर मारले, अश्रूधुराच्या नळकांड्यांचा मारा केला, लाठीमार केला, बंदुकांचा धाक दाखवला, त्याचप्रमाणे रस्त्यांवर खंदक खोदून काढले. दिल्लीजवळ पोहोचल्यावर गृहमंत्री अमित शहा यांच्या दिल्ली पोलिसांनी हरियाणाच्या खट्टर सरकारचीच दडपशाहीची री ओढली होती.

असे असतानाही भाजप सरकारच्या या दडपशाहीला कोणतीही भीक न घालता हे शेतकरी आंदोलक किसानविरोधी कायदे मागे घेण्याच्या आपल्या मागणीपासून तसूभरही मागे हटले नाहीत. आतापर्यंत या दडपशाहीला सामोरे जाताना ७५० पेक्षा जास्त शेतकरी हुतात्मे झाले आहेत. शेतकऱ्यांच्या आंदोलनाला बदनाम करणे, फूट पाडण्याचा प्रयत्न करणे आणि जनतेत भ्रम निर्माण करण्याच्या मोदी सरकारच्या प्रयत्नाला शेतकऱ्यांनी वाटाण्याच्या अक्षता दाखवल्या असून लाखो शेतकरी फक्त दिल्लीच्या सीमांवरच ठाण मांडून बसलेले नव्हते तर रोज हे आंदोलन देशभर अधिकाधिक तीव्र झाले. दिवसेंदिवस तेथील आंदोलक शेतकऱ्यांची संख्या वाढून देशभरातून ५०० पेक्षा जास्त शेतकरी संघटनांचा समावेश असलेल्या संयुक्त किसान मोर्चाच्या नेतृत्वाखाली देशातल्या वेगवेगळ्या भागांतून हजारो शेतकरी व शेतकऱ्यांचे अनेक जथ्थे येऊन सहभागी होत होते.

## महाराष्ट्र राज्य किसान सभेने रणशिंग फुंकले!

या देशव्यापी आंदोलनाचा एक महत्वपूर्ण भाग होण्यासाठी महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या नेतृत्वाखाली शेकडो वाहनांच्या जथ्थाने दोन हजार कार्यकर्त्यांसह २१ डिसेंबरला नाशिक येथे जोरदार जाहीर सभा घेऊन १३०० किलोमीटर अंतराच्या आपल्या निर्धारपूर्ण प्रवासाला सुरुवात केली. महाराष्ट्र, मध्य प्रदेश व राजस्थान या राज्यांतून मार्गक्रमण करताना ठिकठिकाणी प्रचंड स्वागत झालेला हा जथ्था २५ डिसेंबरला दुपारी राजस्थान-हरियाणा सीमेवरील शहाजहाँपूर येथे पोहोचला आणि त्याने राजस्थान-हरियाणाच्या शेतकऱ्यांच्या जथ्थ्याशी जोडून घेतले.

इतक्या दुरून दुसऱ्या कोणत्याच राज्यातील शेतकरी दिल्लीला आले नव्हते. या जथ्थ्याचे नाशिक ते दिल्ली पर्यंतचे नेतृत्व किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, माजी राज्य अध्यक्ष आणि माजी आमदार जे. पी. गावीत, राज्य अध्यक्ष किसन गुजर, राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले, राज्य पदाधिकारी सुनील मालुसरे, इरफान शेख, अर्जुन आडे, उमेश देशमुख, डॉ. उदय नारकर व शंकर सिडाम, राज्य कौन्सिल सदस्य राजा गहला, चंद्रकांत घोरखाना, चंदू धांगडा, किरण गहला, रमेश घुटे, बच्चू वाघात, चिंतू कानल, भरत वळंबा, सुनील सुर्वे, उत्तम कडू, रमेश चौधरी, रमेश बरफ, हनुमंत गुंजाळ, भिका राठोड, शफिक अन्सारी, दिगंबर कांबळे, हणमंत कोळी, सुलेमान शेख, डॉ. शिवानंद झळके, शामसिंग पाडवी, नारसिंग वसावे, बाज्या वळवी, तसेच डीवायएफआयचे राज्य उपाध्यक्ष नंदू हाडळ व इंद्रजीत गावीत, राज्य कमिटी सदस्य सुरजी वेडगा, सुदाम ठाकरे व मनोज माढा आणि एसएफआयचे राज्य कमिटी सदस्य भास्कर म्हसे या सर्वांनी केले.

## जोरदार सभेने नाशिक ते दिल्ली वाहन जथ्थाची सुरुवात

गेल्या तीन आठवड्यांत या आंदोलनात दिल्लीनजीक बळी गेलेल्या शेतकरी शहिदांना श्रद्धांजली वाहून नाशिकच्या गोल्फ क्लब मैदानावरील जाहीर सभेला सुरूवात झाली.

२०१८ साली अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समितीच्या वतीने राज्यसभेत शेतकऱ्यांची कर्जमुक्ती आणि दीडपट हमीभाव याविषयीची दोन विधेयके मांडणारे आणि या तिन्ही शेतकरी कायद्यांविरुद्ध संसदेत अत्यंत त्वेषाने लढणारे माकपचे केरळचे राज्यसभा खासदार आणि किसान सभेचे राष्ट्रीय सहसचिव के. के. रागेश या वाहन रॅलीला हिरवा कंदील दाखवण्यासाठी आवर्जून उपस्थित होते. त्यांचे भाषण सभेचे प्रमुख आकर्षण होते.

किसान सभेचे प्रमुख नेते डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, किसन गुजर, डॉ. अजित नवले आणि सुनील मालुसरे यांच्याव्यतिरिक्त माकपचे राज्य सेक्रेटरी नरसय्या आडम, शेकापचे सरचिटणीस आमदार जयंत पाटील, भाकपचे राज्य सचिवमंडळ सदस्य राजू देसले, काँग्रेसच्या माजी राज्य मंत्री डॉ. शोभा बच्छाव, अभाजमसंच्या राष्ट्रीय सरचिटणीस मरियम ढवळे, सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. डी. एल. कराड, माकपचे डहाणू

मतदारसंघातील आमदार विनोद निकोले, रिपब्लिकन पक्ष (कवाडे गट)चे गणेश उन्हवणे, शेतमजूर युनियनचे राज्य सरचिटणीस बळीराम भुंबे, जमसंच्या राज्य अध्यक्ष नसीमा शेख, डीवायएफआयच्या राज्य सरचिटणीस प्रीती शेखर, एसएफआयचे राज्य उपाध्यक्ष नितीन वाव्हळे आणि इतर स्थानिक नेत्यांची भाषणे झाली.

या सभेनंतर १००हून अधिक वाहनांतील हजारोंच्या उपस्थितीत या वाहन मोर्चाने चांदवड या आपल्या पहिल्या मुक्कामाकडे कूच केले. वाटेत ओझर, पिंपळगाव बसवंत आणि शिरवाडे या गावांत आणि खुद्द चांदवडमध्ये शेकडो शेतकरी व कामगारांनी या मोर्चाचे स्वागत केले.

## महाराष्ट्रात जंगी स्वागत

२२ डिसेंबरला महाराष्ट्रातून मार्गक्रमण करीत असताना या वाहन जथ्थ्याचे चांदवड, मालेगाव, धुळे आणि शिरपूर तसेच वाटेतील अनेक लहान मोठ्या गावांत हजारो लोकांनी जंगी स्वागत केले.

२००६ साली प्रज्ञा सिंग ठाकूर आणि प्रसाद पुरोहित यांच्यावर जिथे बॉम्बस्फोट केल्याचा आरोप आहे त्या मालेगावमध्ये, २००८ आणि नंतर २०१३ साली जिथे भाजप-आरएसएसच्या चिथावणीने धर्मांध दंगली झाल्या त्या धुळेमध्ये हजारो लोकांनी रस्त्यावर येऊन या जथ्थ्याचे उत्स्फूर्त स्वागत केले. त्यात सर्व धर्म, जाती आणि वर्गांतील लोक सहभागी होते, हे विशेष. देशात सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनाला मिळालेला हा जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता. असाच प्रतिसाद महाराष्ट्रातील जनतेने यापूर्वी ८ डिसेंबरच्या भारत बंदलाही दिला होता.

रात्री शिरपूर येथे मुक्काम करून हा जथ्था २३ डिसेंबरला सकाळी मध्य प्रदेशकडे मार्गस्थ झाला.

## व्यापक राजकीय पाठिंबा

भाजप वगळता महाराष्ट्रातील इतर सर्व राजकीय पक्षांचा मिळालेला पाठिंबा हे किसान सभेच्या या जथ्याचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. यात सत्ताधारी महाविकास आघाडीतील शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस, तसेच सपा, जनता दल (से), बसपा, रिपब्लिकन पक्ष, बहुजन विकास आघाडी आणि अर्थातच शेकाप, माकप, भाकप हे तीन डावे पक्ष या सर्वांचा समावेश होता. त्यांच्या नेत्यांनी अनेक ठिकाणी या जथ्थ्याचे स्वागत केले, एवढेच नव्हे, तर त्यांच्या खाण्या-पिण्याची तसेच राहण्याची व्यवस्थाही केली. अनेक सामाजिक संस्था, एनजीओ यांनीही मदतीचा हात पुढे केला.

सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. डी. एल. कराड यांच्या नेतृत्वाखाली शेकडो सीटू कायकर्ते जथ्थ्यासोबत महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत आले. तसेच सीटूचे राज्य सेक्रेटरी आमदार विनोद निकोले, डीवायएफआयच्या राज्य सचिव प्रीती शेखर, एसएफआयच्या राज्य उपाध्यक्ष कविता वरे हे देखील महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत जथ्थ्यासोबत आले.

## मध्य प्रदेशातील उत्साही स्वागत

२३ डिसेंबरच्या सकाळी या जथ्थ्याने मध्य प्रदेशात प्रवेश करताच सेंधवा सीमेवर नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या मेधा पाटकर यांच्या नेतृत्वात शेकडो कार्यकर्त्यांनी जथ्थ्याचे स्वागत केले. त्यानंतर खरगोन जिल्ह्याच्या निमाड येथील सेन्चुरी मिल्सच्या शेकडो कामगारांनी या वाहन मोर्चाचे स्वागत केले. यानंतर धार जिल्ह्यातील खालघाट येथेही जथ्थ्याचे असेच जबरदस्त स्वागत झाले. मेधा पाटकर आणि त्यांचे कार्यकर्ते जथ्थ्यासोबत इथवर आले होते.

चोवीस तासांचा प्रवास करून हा जथ्था २४ डिसेंबरच्या सकाळी मध्य प्रदेश ओलांडून राजस्थानात पोहोचला.

## राजस्थानातही जोरदार स्वागत

राजस्थानातील कोटा येथे जथ्था पोहोचताच किसान सभा, सीटू आणि इतर संघटनांनी गुलाबाच्या पाकळया. २४ डिसेंबरच्या रात्री जथ्था राजस्थानची राजधानी जयपूर येथे पोहोचला. तिथे सुमित्रा चोप्रा तसेच सीटू, जनवादी महिला संघटना आणि इतर संघटनांच्या अनेक नेत्यांनी त्याचे स्वागत केले. इथेही स्थानिक गुरुद्वाराने जेवण व निवासाची उत्तम सोय केली होती.

२५ डिसेंबर हा ख्रिससमसचा दिवस. याच दिवशी १९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्ह्यातील महाड येथे केलेल्या मनुस्मृती दहनाचा तो ९३वा स्मृतिदिनही होता. या दिवशी महाराष्ट्र राज्य किसान सभेचा जथ्था जयपूरहून निघून दुपारी राजस्थान-हरियाणा सीमेवर असलेल्या शहाजहाँपूर येथे पोहोचला.

## शहाजहाँपूर सीमेवरील प्रचंड स्वागत

महाराष्ट्र राज्य किसान सभेचे कार्यकर्ते या सीमेवर पोहोचताच राजस्थान, हरियाणा आणि पंजाबच्या हजारो शेतकऱ्यांनी प्रचंड उत्साहात त्यांचे स्वागत केले.

त्यात किसान सभेचे राष्ट्रीय सरचिटणीस हन्नन मोल्ला, उपाध्यक्ष आमरा राम, सहसचिव विजू कृष्णन, कोषाध्यक्ष पी. कृष्णप्रसाद, सीटूच्या राष्ट्रीय अध्यक्ष के. हेमलता, शेतमजूर युनियनचे राष्ट्रीय सरचिटणीस बी. वेंकट, सहसचिव विक्रम सिंग, जमसंच्या राष्ट्रीय सरचिटणीस मरियम ढवळे, सहसचिव आशा शर्मा, कोषाध्यक्ष एस. पुण्यवती, एसएफआयचे अध्यक्ष व्ही. पी. सानू, किसान सभेचे नेते मेजर सिंग, धरमपाल सिंग सील, पेमा राम, छगनलाल चौधरी, दुलीचंद, संजय माधव, सीटूचे नेते सुरेंद्र सिंग, सुरेखा, जोगेंद्र शर्मा, जमसं नेत्या अर्चना प्रसाद, पीएसएमचे नेते दिनेश अब्रोल आणि इतर अनेक किसान संघटनांचे नेते उपस्थित होते.

या स्वागत समारंभानंतर झालेल्या प्रचंड जाहीर सभेत किसान सभेचे अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, सरचिटणीस हन्नन मोल्ला, सीटूच्या अध्यक्ष के. हेमलता, शेतमजूर युनियनचे सरचिटणीस बी. वेंकट, जमसंच्या सरचिटणीस मरियम ढवळे, किसान सभेचे माजी राज्य अध्यक्ष जे.पी. गावित, राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले आणि इतर अनेक नेत्यांची भाषणे झाली.

महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या जथ्थ्याला १००च्या वर वाहनांतून सुमारे २००० शेतकऱ्यांनी २१ डिसेंबरला नाशिक येथून सुरुवात केली. त्यापैकी काही जण २२ डिसेंबरच्या रात्री म्हणजे महाराष्ट्राच्या सीमेपर्यंत जथ्थ्यासोबत होते. थेट दिल्लीपर्यंत ५० वाहनांतून जवळपास १००० शेतकरी आले.

किसान सभेच्या या जथ्थ्याला सर्व प्रसारमाध्यमांनी, आणि त्यातही अर्थातच समाज माध्यमांनी उत्तम प्रसिद्धी दिली.

★★★

# दिल्लीतील शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ १५ हजार शेतकरी-श्रमिकांचा नाशिक ते मुंबई भव्य वाहन जथ्था, मुंबईत तीन दिवसीय विशाल संयुक्त महामुक्काम

विजय पाटील

**२३ जानेवारी :** नाशिकच्या गोल्फ क्लब मैदानाच्या पूर्व भागातील भव्य इदगाह मैदानावर मोठ्या संख्येने दाखल होणारी लाल बावटे लावलेली वाहने आणि त्या वाहनांमधून केंद्र सरकारच्या काळ्या कृषी कायद्यांना गाडण्याच्या निर्धाराने मुंबईकडे कूच करणारे, डोक्यावर किसान सभेची लाल टोपी व खांद्यावर लाल बावटा घेऊन निघालेले हजारो शेतकरी आणि त्यांच्या गगनभेदी घोषणा. त्यांच्या खांद्याला खांदा लावून सहभागी होते कामगार-शेतमजूर-महिला-युवक-विद्यार्थी त्यांच्या-त्यांच्या बावट्यांसह.

हे उत्साहवर्धक दृष्य होते मोदी-शहांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने मंजूर केलेल्या शेतकरी विरोधी कृषी कायद्यांच्या विरोधात दिल्लीच्या सीमांवर गेल्या दोन महिन्यांपासून सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी; त्याचबरोबर हे कायदे आणि कामगार विरोधी श्रम संहिता रद्द करा या मागण्यांसाठी 'संयुक्त शेतकरी कामगार मोर्चा'च्या वतीने आयोजित मुंबईतील आझाद मैदानावर २४ ते २६ जानेवारीपर्यंत होणाऱ्या 'महामुक्काम' आंदोलनात सहभागी होणाऱ्या नाशिक ते मुंबई भव्य वाहन जथ्थाच्या प्रारंभाचे.

दिल्ली येथे सुरू असलेल्या लढ्यात अखिल भारतीय किसान सभा एक प्रमुख घटक आहे. या लढयाचे मुख्य नेतृत्व करणाऱ्या 'संयुक्त किसान मोर्चा'च्या आवाहनानुसार, दिल्ली येथे २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी 'भव्य ट्रॅक्टर मार्च' काढण्याबरोबरच देशभरात सर्व राज्यांतील राजधानीच्या ठिकाणी आंदोलन करण्याचे ठरविण्यात आले होते. २३ जानेवारीला महामुक्काम आंदोलनाने याची सुरुवात होऊन २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी शेतकऱ्यांची परेड काढून केंद्र शासनाचे प्रतिनिधी म्हणून राज्यपाल भवनावर मोर्चा नेण्याचे निश्चित करण्यात आले.

महाराष्ट्रात किसान सभेच्या पुढाकाराने आंदोलनात सहभागी सर्व घटक पक्ष, जनसंघटना तसेच स्वयंसेवी संघटना यांच्या बैठकीत मुंबईत आझाद मैदानावर २४ जानेवारीला 'महामुक्कामा'ने या आंदोलनाची सुरुवात करून २५ जानेवारीला राज्यपाल भवनावर मोर्चा काढून २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनी राष्ट्रध्वजाचे रोहण व वंदन करून आंदोलनाची सांगता करण्याचे ठरविण्यात आले. अखिल भारतीय किसान सभा, सीटू, अखिल भारतीय शेतमजूर युनियन, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, डीवायएफआय, एसएफआय या संघटनांनी हजारोंच्या संख्येने यात सहभागी होण्याचा निर्णय घेतला. नाशिक येथे २२ जानेवारीला झालेल्या पत्रकार परिषदेत याची अधिकृत घोषणा करण्यात आली. या परिषदेला डॉ. अशोक ढवळे, डॉ. डी. एल. कराड, किसन गुजर, अजित नवले आणि सुनिल मालुसरे उपस्थित होते.

## वाहन जथ्था मुंबईकडे रवाना

२३ तारखेच्या सकाळपासूनच राज्यातल्या विविध जिल्ह्यांतून जथ्याची वाहने इदगाह मैदानावर जमायला सुरुवात झाली होती. दुपारी ३ वाजेपर्यंत सर्व वाहने दाखल झाल्यानंतर प्रारंभी जोरदार सभा झाली. या सभेला किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, जनवादी महिला संघटनेच्या राष्ट्रीय सरचिटणीस मरियम ढवळे, सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. डी.एल. कराड, किसान सभेचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले, सीटूचे राज्य सचिव आमदार विनोद निकोले, डीवायएफआयच्या राज्य सरचिटणीस प्रीती शेखर, एसएफआयच्या राज्य उपाध्यक्ष कविता वरे यांनी संबोधित केले. अध्यक्षीय समारोप किसान सभेचे राज्य अध्यक्ष किसन गुजर यांनी केल्यानंतर वाहन जथ्था मार्गस्थ झाला. जथ्थ्यात किसान सभा व अन्य जनसंघटनांच्या शेकडो मोठ्या वाहनांसह सीटूच्या १०० हून अधिक मोटरसायकल सहभागी झाल्या होत्या.

जोरदार घोषणा देत शहरातून मोठ्या दिमाखाने मुंबईकडे निघालेल्या या अत्यंत शिस्तबद्ध वाहन जथ्थ्याचे तेवढ्यात उत्स्फुर्तपणे नाशिकच्या नागरिकांनी स्वागत केले. नाशिकहून मुंबईच्या दिशेने निघालेल्या या जथ्थ्याचा पहिला मुक्काम इगतपुरी येथील कसारा घाटाच्या सुरुवातीला असलेल्या घाटनदेवी मंदिराच्या प्रांगणात झाला.

## कसारा घाटातून पायी जथ्था

२३ तारखेच्या रात्री घाटनदेवी मंदिराच्या प्रांगणात मुक्काम केल्यानंतर २४ तारखेला सकाळी बरोबर ९ वाजता जथ्था कसारा घाटातून पायी मुंबईकडे मार्गस्थ झाला. हजारो लोक घाटाचा रस्ता उतरतांनाचे ते अत्यंत विलोभनीय दृश्य होते आणि दोन वर्षांपूर्वीच्या 'किसान लॉंग मार्च'ची सर्वांनाच प्रकर्षाने आठवण झाली.

पायी जथ्थ्याचे नेतृत्वस्थानी किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, राज्य अध्यक्ष किसन गुजर, राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले, राज्य पदाधिकारी सुनील मालुसरे, बारक्या मांगात, रतन बुधर, रडका कलांगडा, सावळीराम पवार, सुभाष चौधरी, दादा रायपुरे, अर्जुन आडे, शंकर सिडाम, उद्धव पौळ, उमेश देशमुख, डॉ. उदय नारकर व माणिक अवघडे, सीटूचे राज्य सचिव आमदार विनोद निकोले, अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या राष्ट्रीय सरचिटणीस मरियम ढवळे, राज्य सरचिटणीस प्राची हातिवलेकर, राज्य पदाधिकारी लहानी दौडा, ताई बेंदर, सुनिता शिंगडा व हीना वनगा, शेतमजूर युनियनचे राज्य अध्यक्ष मारोती खंदारे, राज्य पदाधिकारी नथ्थु साळवे व विनोद गोविंदवार, डीवायएफआयच्या राज्य सरचिटणीस प्रीती शेखर, राज्य पदाधिकारी नंदू हाडळ, इंद्रजीत गावीत, कैलास बलसाने, अजय बुरांडे व मोहन जाधव, एसएफआयचे राज्य अध्यक्ष बालाजी कलेटवाड, राज्य सरचिटणीस रोहिदास जाधव, राज्य पदाधिकारी कविता वरे, मल्लेशम कारमपुरी, सुहास झोडगे, नवनाथ मोरे व पूजा कांबळे आणि किसान सभेच्या राज्य कौन्सिलचे अनेक सदस्य होते.

यावेळी सर्व जनसंघटनांचे नेतृत्व झाडून हजर होते. त्यानंतर किसान सभा, सीटू व शेतमजूर युनियनचे लाल बावटे आणि जनवादी महिला संघटना, डीवायएफआय व एसएफआयचे सफेद झेंडे घेतलेले १५ हजारांहून अधिक कार्यकर्ते व शेवटी शेकडो वाहने. असा भव्य जथ्था मोठ्या दिमाखात, जोरदार घोषणा देत, घाटातील रस्त्याची डौलदार वळणे दिमाखात पार करत मुंबईतील राजभवनावर धडक देण्यासाठी मार्गक्रमण करीत होता. त्यांचा दृढ निर्धार होता काळे कायदे मातीत गाडण्याचा. सोबत होता शेकडो पोलिसांचा ताफा व या जथ्थ्याचे छायांकन करण्यासाठी आलेले वृतसंस्थांचे मोठ्या संख्येने उपस्थित असलेले छायाचित्रकार. बहुतेक सर्व वृत्तवाहिन्यांवर याचे थेट प्रसारण दाखवण्यात येत होते. तीन तासांनंतर हा जथ्था १० किलोमीटरचे अंतर पार करत कसारा घाट उतरून घाटाखालील लतीफवाडी येथे पोहोचला व वाहनांमधून मुंबईकडे त्याने प्रस्थान केले.

## जथ्थ्याचे ठिकठिकाणी जोरदार स्वागत

इगतपुरी व शहापूर तालुक्यांच्या कारखान्यांसमोर सीटूच्या शेकडो कामगारांतर्फे शेतकरी जथ्थ्याचे हार्दिक स्वागत करण्यात आले. कल्याण फाट्यावर माकप, भाकप, सीटू, डीवायएफआय आणि अमृतवेली गुरुद्वारा यांच्यामार्फत सर्व शेतकऱ्यांना जेवणाची पाकिटे दिली गेली. ठाणे शहरात माकप व शेकाप यांच्यातर्फे उत्साही स्वागत केले गेले.

मुंबईत विक्रोळी येथे माकप, सीटू, डीवायएफआय, जमसंच्या शेकडो कार्यकर्त्यांनी सीटूचे नेते महेंद्र सिंह व हेमकांत सामंत यांच्या नेतृत्वाखाली सर्वांचे स्वागत केले.

सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास हा जथ्था मुंबईत दाखल होऊन त्याने आझाद मैदानावरील महामुक्कामात सहभाग घेतला.

कामगार संघटना संयुक्त कृती समिती, पुणे यांच्यावतीने व सीटुचे नेते अजित अभ्यंकर यांच्या नेतृत्वाखाली पुणे येथून सायकलस्वारांचा जथ्था २० जानेवारीला मार्गस्थ होवून १५० किलोमीटरचा प्रवास करत २४ जानेवारीला मुंबईत आझाद मैदानावरील महामुक्कामात सहभागी झाला. या जथ्थ्याचे मार्गात ठिकठिकाणी उत्साहात स्वागत करण्यात आले.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला २५ जानेवारी रोजी महामुक्कामाच्या दुसऱ्या दिवशी आझाद मैदानावरील भव्य मंडपात ४० हजार शेतकरी, कामगार आणि इतर श्रमिक घटकांच्या सहभागाने भव्य सभा झाली. यात मोठ्या संख्येने महिला, युवक व विद्यार्थी सहभागी झाले होते. राज्यातील सर्व जिल्ह्यांतून या सभेला उपस्थिती होती.

## भव्य जाहीर सभा

डाव्या संघटनांची बहुसंख्य उपस्थिती त्यांनी डोक्यावर चढवलेल्या लाल टोप्यांनी प्रकर्षाने जाणवत होती. आदिवासी शेतकऱ्यांचे पारंपारिक तारपा वादन व नृत्य, ढोल वादन व नृत्य, पुरोगामी गीत गायनाचे शाहिरी जलसे आंदोलनात उत्साह भरत होते. अनेक किलोमीटर प्रवास करून आलेला थकवा, रात्री आझाद मैदानाच्या मंडपात व मंडपाबाहेरील मोकळ्या मैदानात उघड्यावर थंडगार वातावरणात आदल्या रात्री केलेला मुक्काम आंदोलक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर जाणवत असूनही मोदी सरकारने त्यांच्यापुढे उभे केलेले संकट व कष्टमय जीवन नष्ट करण्याचा निर्धार त्यांच्या रोमारोमात जाणवत होता.

अखिल भारतीय किसान सभेच्या पुढाकाराने फक्त १३ दिवसांपूर्वी १२ जानेवारीला झालेल्या संयुक्त बैठकीत स्थापन झालेल्या 'संयुक्त शेतकरी कामगार मोर्चा'ने या आंदोलनाचे यशस्वी नियोजन केले. यात शेतकरी, कामगार, शेतमजूर, महिला, युवक आणि विद्यार्थी आणि अर्थातच अनेक सामाजिक संघटना अशा १०० पेक्षा अधिक वेगवेगळ्या क्षेत्रातील संघटनांचा समावेश आहे. या ऐतिहासिक सभेने महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या अनेक वर्षांनंतर पहिल्यांदाच भाजपला विरोध करणाऱ्या सर्व राजकीय व सामाजिक शक्ती एकत्र मंचावर आणण्याचे महतकार्य केले.

माजी केंद्रीय मंत्री, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेसचे राज्य अध्यक्ष व राज्याचे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माकपचे पॉलिटब्युरो सदस्य व अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय सरचिटणीस माजी खासदार हन्नन मोल्ला, शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस आमदार भाई जयंत पाटील, अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, सुप्रसिद्ध ज्येष्ठ पत्रकार पी. साईनाथ, धर्मांध शक्तींच्या विरोधात जोरदार लढा देणाऱ्या ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड, माकपचे राज्य सचिव माजी आमदार नरसय्या आडम, शिवसेनेचे नेते राहुल लोंढे, समाजवादी पार्टीचे नेते अबू असीम आझमी, भाकपचे राज्य सचिव तुकाराम भस्मे, आपचे राज्य सचिव धनंजय शिंदे, अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या राष्ट्रीय सरचिटणीस मरियम ढवळे, अखिल भारतीय किसान सभेचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले, जन आंदोलनांच्या राष्ट्रीय मंचाच्या नेत्या मेधा पाटकर, सीटूचे राज्य उपाध्यक्ष डॉ. विवेक मोन्टेरो, मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. जी. कोळसे पाटील, प्राध्यापक संघटनेच्या राज्य अध्यक्ष तापसी मुखोपाध्याय, राष्ट्रवादीच्या नेत्या माजी आमदार विद्या चव्हाण, काँग्रेसचे मुंबईचे अध्यक्ष आमदार भाई जगताप, सर्वहारा जन आंदोलनाच्या नेत्या उल्का महाजन, कष्टकरी संघटनेचे नेते ब्रायन लोबो, सत्यशोधक शेतकरी सभेचे नेते किशोर ढमाले, यांच्यासह अनेक वक्त्यांनी सभेस संबोधित केले.

सर्व वक्त्यांनी मोदी सरकारचे आवाहन केले. शेतकऱ्यांना आपल्या शेतमालासाठी किमान आधारभूत किमतीचे संरक्षण देणारा कायदा करावा अशीही मागणी त्यांनी केली.

मंचावर काँग्रेसचे खासदार कुमार केतकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व राज्याचे मंत्री जितेंद आव्हाड व सुनील केदार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी आमदार विद्या चव्हाण, काँग्रेसचे प्रवक्ते सचिन सावंत व नसीम खान, भाकपचे नेते प्रकाश रेड्डी, यांच्यासह सहभागी सर्व पक्षांचे प्रमुख नेते उपस्थित होते.

सभेच्या अध्यक्षमंडळात शेकापचे ॲड. राजेंद्र कोरडे, भाकपचे मिलिंद रानडे आणि माकपचे डॉ. एस. के. रेगे व शैलेंद्र कांबळे हे होते.

## राजभवनाकडे कूच

सभेच्या सांगतेनंतर दुपारी ४ वाजता शेतकरी–कामगारांच्या मागण्यांचे निवेदन घेऊन आंदोलकांनी आझाद मैदानावरून मोर्चा काढून राजभवनाकडे कूच केली. यात सर्व घटक पक्ष व संघटनांच्या नेत्यांचा व हजारो आंदोलकांचा समावेश होता. पारंपारिक वेशभूषा, पारंपारिक वाद्य वादन व नृत्य–गायन करीत जोरदार घोषणांच्या निनादात निघालेला हा मोर्चा मेट्रो सिनेमाजवळील चौकात पोलिसांनी मोठे अडथळे उभे करून अडविल्यावर नेत्यांची पोलिसांबरोबर झटापट झाली. पोलिसी बळावर

**(पान २८ पहा)**

# लखीमपूर खेरी शहिदांच्या महाराष्ट्रभर अस्थिकलश यात्रा आणि मुंबईतील विराट शेतकरी-कामगार महापंचायत

किसन गुजर

गेल्या वर्षी कोरोना महामारीमुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या काळात मोदी-शहा यांच्या नेतृत्वाखालील भाजपच्या केंद्र सरकारने घटनेची पायमल्ली करून, हुकुमशाही पद्धतीने व संसदीय नियम धाब्यावर बसवून सप्टेंबर २०२० मध्ये तीन शेतकरीविरोधी कृषी कायदे पास करून घेतले. हे तिन्ही कायदे जून २०२० मध्ये अध्यादेशांच्या रूपाने प्रथम आल्यापासूनच त्यांना भाजप व त्याचे काही मित्रपक्ष वगळता देशातील जवळजवळ सर्व किसान संघटना, अनेक पक्ष व संघटना, अनेक राज्य सरकारे, हजारो लोकप्रतिनिधी व लाखो शेतकऱ्यांनी विरोध केला होता. तेव्हापासून देशभरात शेतकऱ्यांनी हजारोंच्या संख्येने प्रखर आंदोलने व लढे सुरु केले. केंद्र सरकारचे शेतकरीविरोधी व कॉर्पोरेटधार्जिणे कृषी कायदे मागे घेऊन, शेतकऱ्यांच्या शेतीमालाला रास्त हमी भाव देणाऱ्या कायद्यासह स्वामिनाथन आयोगाची अंमलबजावणी करा, या व इतर मागण्यांच्या पूर्ततेसाठी शेतकरी केंद्र शासनाशी संघर्ष करण्याच्या मजबूत तयारीने लढ्यात उतरले. आणि याचे गौरवपूर्ण उदाहरण म्हणजे गेल्या एक वर्षाहून अधिक काळ चाललेले दिल्लीच्या सीमांवरील शेतकरी आंदोलन.

२०१९ ला परत एकदा बहुमताने निवडून आलेल्या मोदी सरकारने भाजप-आरएसएसच्या व कॉर्पोरेट भांडवलदारांच्या छुप्या अजेंड्यानुसार काम करायला सुरुवात केली. काश्मीरच्या जनतेला विश्वासात न घेता ३७० कलम तडकाफडकी रद्द केले आणि राज्याचा दर्जा सुद्धा काढून घेतला. राममंदिराच्या उभारणी कार्यक्रमात सरसंघचालक मोहन भागवत यांच्याबरोबर पंतप्रधान मोदींनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. जनतेच्या पैशांनी उभे राहिलेले सार्वजनिक उद्योग कवडीमोल भावाने बड्या भांडवलदारांना विकणे सुरू केले. भांडवलदारांची लाखो कोटी कर्जे माफ केली. याबरोबरच भांडवलदारांच्या फायद्यासाठी कामगारांना कायदेशीर संरक्षण प्रदान करणारे २९ कायदे रद्द करून त्या ठिकाणी भांडवलदारांच्या फायद्याच्या चार श्रम संहिता लागू केल्या. देशातील शेतकऱ्यांच्या महत्त्वपूर्ण मागण्या नाकारून कोणीही मागणी न केलेले व शेतकऱ्यांना गुलाम करणारे तीन कृषी कायदे बहुमताच्या जोरावर संसदेत कोणत्याही चर्चेविना पारित केले. या कायद्यांच्या विरोधातील संघर्ष २६ नोव्हेंबर २०२१ पासून अखंडितपणे दिल्लीच्या सीमांवर सुरू झाला.

या संघर्षाला एक वर्ष पूर्ण झाले. थंडी, वारा, ऊन, पाऊस, वादळ व भाजप सरकारची दडपशाही, बदनामी व कटकारस्थाने यांचा सामना करत लाखो शेतकरी रात्रंदिवस दिल्लीच्या सीमांवर ठाण मांडून बसले. शेतकऱ्यांच्या या निर्धारामुळे चवताळलेल्या मोदी सरकारने व त्याच्या पाठीराख्यांनी शेतकऱ्यांवर हल्ले सुरू केले. लखीमपुर खेरी येथे शांतपणे निदर्शने करणाऱ्या शेतकऱ्यांना भाजप सरकारचे केंद्रीय गृह राज्यमंत्री अजय मिश्रा टेनी यांच्या मुलाने अंगावर गाड्या घालून चिरडून ठार मारण्याचे घृणास्पद कृत्य केले. त्यात चार शेतकरी व एक पत्रकार यांचा मृत्यू झाला तर अनेक शेतकरी गंभीर जखमी झाले.

प्रचंड दडपशाही होऊनही शेतकरी आजही आपल्या मागण्यांवर ठाम होते. कामगारही त्यांच्या मागण्यांसह शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी संयुक्तपणे देशभर जोरदार लढे करीत आहेत व त्यांनी मोदी सरकारला जेरीस आणले आहे. याचाच परिणाम म्हणून मोदी सरकारने शेतकरी विरोधी कृषी कायदे रद्द करण्याची घोषणा केली व संसदेत कायदे रद्द करण्याचा प्रस्ताव मंजूर केला. शेतकरी आंदोलनाचा हा ऐतिहासिक विजय आहे. अजूनही शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या हमी भावाला कायदेशीर संरक्षण द्यावे या मागणीसह स्वामिनाथन आयोगाची अंमलबजावणी व इतर मागण्या पूर्ण झालेल्या नाहीत. केंद्र शासनाने प्रस्तावित वीज विधेयक मागे घेतलेले नाही. या मुद्द्यांवर जोपर्यंत सरकार निर्णय घेत नाही तोपर्यंत हा लढा चालू ठेवण्याचा शेतकऱ्यांचा निर्धार आहे.

कृषी कायदे रद्द झाल्याचा विजयोत्सव साजरा करण्यासाठी, लखीमपूर खेरी येथील हल्ल्यात शहीद झालेले शेतकरी व पत्रकार यांना आदरांजली देण्यासाठी तसेच शेतकरी-कामगारांच्या उर्वरित मागण्यांसाठी जोरदार आंदोलन उभारण्याचा निर्धार करण्यासाठी संयुक्त शेतकरी कामगार मोर्चातर्फे मुंबई येथील आझाद मैदान येथे २८ नोव्हेंबर रोजी विराट महापंचायत आयोजित करण्यात आली. या महापंचायतीत राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यांतील २५ हजार शेतकरी-कामगारांचा सहभाग होता.

महान समाजसुधारक व 'शेतकऱ्यांचा आसूड' या बहुमूल्य ग्रंथातून तत्कालीन शेतकऱ्यांच्या व्यथा मांडणारे आद्य किसान नेते महात्मा जोतीराव फुले यांचा २८ नोव्हेंबर हा स्मृतिदिन. या दिवसाचे औचित्य साधून 'संयुक्त शेतकरी कामगार मोर्चा, महाराष्ट्र' यांच्यातर्फे ही महापंचायत आयोजित करण्यात आली. यात संयुक्त किसान मोर्चाचे सर्व केंद्रीय शीर्ष नेतृत्व उपस्थित होते व त्यांनी जोरदार मार्गदर्शन केले.

## लखीमपूर खेरी येथील शहिदांची अस्थिकलश यात्रा

लखीमपूर खेरी येथील हल्ल्यात शहीद झालेल्या शहिदांच्या अस्थिकलश यात्रा महाराष्ट्रात २७ ऑक्टोबर ते २७ नोव्हेंबर या काळात काढण्यात आल्या. त्याची सुरुवात पुणे येथील महात्मा जोतीराव फुले यांचे स्मृतीस्थळ असलेल्या फुले वाड्यापासून झाली.

'शेतकऱ्याचा आसूड' आणि 'गुलामगिरी' अशा विद्रोही पुस्तकांचे लेखक, शेतकऱ्यांचे कैवारी, जातिव्यवस्थेचे शत्रू आणि सावित्रीबाईंसह भारतातील पहिल्या मुलींच्या शाळेचे संस्थापक असलेल्या महात्मा जोतीराव फुले यांच्या वाड्यापासून या शेतकरी यात्रेची सुरुवात व्हावी हे सर्वार्थाने योग्यच होते.

अखिल भारतीय किसान संघर्ष समन्वय समिती, कामगार संघटना संयुक्त कृती समिती आणि जनआंदोलनांची संघर्ष समिती या तीन व्यासपीठांत असलेल्या सर्व घटक संघटनांतर्फे हा कार्यक्रम एकजुटीने आयोजित करण्यात आला होता.

अनेक वर्षांपूर्वी राष्ट्रीय स्मारक म्हणून

जाहीर केलेल्या ऐतिहासिक फुले वाड्यात या सर्व संघटनांचे कार्यकर्ते जमा झाले. महात्मा जोतीराव फुले यांच्या पुतळ्याला अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे यांनी, आणि सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला जनआंदोलनांच्या राष्ट्रीय समन्वयाच्या राष्ट्रीय नेत्या मेधा पाटकर यांनी पुष्पहार घालून या शहीद कलश यात्रेची सुरुवात झाली.

पुणे मार्केट यार्ड येथील हमाल भवनात या प्रसंगी चांगली जाहीर सभा झाली. दिल्लीच्या शेतकरी आंदोलनातून परत येताना मृत्युमुखी पडलेल्या लोक संघर्ष मोर्चाच्या कार्यकर्त्या सीताबाई तडवी यांचे नाव सभागृहाला देण्यात आले होते. पुणे जिल्ह्यातून सभेला चांगली उपस्थिती होतीच, शिवाय महाराष्ट्रातील इतर अनेक जिल्ह्यांतून कार्यकर्ते आले होते. मुंबईतून कामगार संघटना संयुक्त कृती समितीतर्फे कामगार प्रतिनिधींची एक बस, आणि सोलापूरहून माकप-प्रणित जनसंघटनांच्या कार्यकर्त्यांची आणखी एक बस आवर्जून आल्या होत्या. या कार्यक्रमातील महिलांची संख्या लक्षणीय होती.

अरविंद जक्का यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केल्यावर अजित अभ्यंकर यांनी प्रास्ताविक केले. अध्यक्षस्थानी मानव कांबळे हे होते. लखीमपूर खेरी येथील पाच शहीद आणि या शेतकरी आंदोलनातील आजवरचे एकूण ६३१ शहीद यांना सर्वप्रथम आदरांजली वाहण्यात आली. येथे झालेल्या प्रभावी सभेत डॉ. अशोक ढवळे, मेधा पाटकर, प्रतिभा शिंदे, नामदेव गावडे, डॉ. अजित नवले, विद्या चव्हाण, सुभाष वारे, विश्वास उटगी, सुभाष काकुस्ते, उल्का महाजन आणि किशोर ढमाले यांची भाषणे झाली. विलास किरोते यांनी आभार मानले.

पुण्यातील या कार्यक्रमासाठी किसान सभेचे नेते किसन गुजर, सिद्धप्पा कलशेट्टी, उमेश देशमुख, जितेंद्र चोपडे, अॅड. नाथा शिंगाडे, अमोल वाघमारे, लक्ष्मण जोशी, दिगंबर कांबळे, संजय ठाकूर, नारायण गायकवाड, सीटूचे नेते एन. एच. शेख, डॉ. विवेक मॉन्टेरो व इतर अनेकजन हे हजर होते.

किसान सभेने या यात्रेसाठी एक विशेष जीप गाडी सजवली होती. किसान सभेचे राज्य कौन्सिल सद्सय जितेंद्र चोपडे (खामगाव, जि. बुलडाणा) हे या यात्रेसह राज्यभर फिरले.

राज्यातील सर्व जिल्ह्यांत या यात्रांचे जोरदार स्वागत झाले, अनेक ठिकाणी प्रभावी सभा झाल्या. यात जनतेचा उत्स्फूर्त सहभाग होता व हजारो लोकांनी शहिदांना भावपूर्ण आदरांजली वाहिली. या यात्रेचा समारोप मुंबई येथे २८ नोव्हेंबर रोजी सकाळी हुतात्मा स्मारक येथे झाला. २७ नोव्हेंबर रोजी 'जनशक्ती' या वरळी येथील माकपच्या राज्य कार्यालयापासून सुरू झालेली यात्रा शिवाजी पार्क येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मृतीस्थळ असलेली चैत्यभूमी, परळ येथे हुतात्मा बाबू गेनू यांचे स्मारक येथे अभिवादन करून मंत्रालयाजवळ महात्मा गांधी यांच्या पुतळ्यापाशी पोहोचली. दुसऱ्या दिवशी सकाळी उपस्थितांनी हुतात्मा चौकात पुष्पांजली अर्पण केल्यानंतर शहिदांना अभिवादनाच्या जोरदार घोषणांनी शहीद कलश यात्रेचा समारोप झाला.

## विराट शेतकरी कामगार महापंचायत

२८ नोव्हेंबरची मुंबईच्या आझाद मैदानावरील सकाळ 'संयुक्त शेतकरी कामगार मोर्चा'तील सहभागी संघटनांच्या विविधरंगी झेंड्यांनी सजली होती. राज्यातील विविध जिल्ह्यांतून येणाऱ्या शेतकरी-कामगार-शेतमजूर-महिला-विद्यार्थी-युवकांनी आझाद मैदानावर चैतन्य आणले होते. त्यांच्या चेहऱ्यावर शेतकऱ्यांनी हुकुमशहाला नमवून काळे कृषी कायदे रद्द करायला लावण्याचा आनंद होता व त्याबरोबरच उर्वरित मागण्यांसाठी संघर्ष करण्याचा निर्धार होता.

सकाळी बरोबर ११.३० वाजता महापंचायतीला सुरुवात झाली. यावेळी महापंचायतीसाठी उभारलेल्या भव्य मंचासमोरील मंडपात बसायला जागा अपुरी पडल्यामुळे मंडपाबाहेरही शेकडो लोक उभे होते. शेतकरी सभेचे अॅड. राजू कोरडे यांनी उपस्थितांचे स्वागत करून अ. भा. किसान सभेचे माजी राज्य अध्यक्ष व माजी आमदार जे.पी. गावीत व कामगार नेते मिलिंद रानडे यांच्या अध्यक्ष मंडळाची सूचना केली. त्यास लोक संघर्ष मोर्चाच्या प्रतिभा शिंदे यांनी अनुमोदन दिल्यानंतर महापंचायतीला सुरुवात झाली.

यावेळी मंचावर संयुक्त किसान मोर्चाचे नेते राकेश टिकैत (बीकेयू-टिकैत), डॉ. दर्शन पाल (क्रांतिकारी किसान युनियन), मा.खा. हन्नन मोल्ला (अखिल भारतीय किसान सभा), तजिंदर सिंह विर्क (तेराई किसान संघटन), अतुल कुमार अंजान (अ.भा. किसान सभा), योगेंद्र यादव (जय किसान आंदोलन), राजाराम सिंह (अ.भा. किसान महासभा), युद्धवीर सिंह (बीकेयू-टिकैत), जसबीर कौर नाट (अ.भा. किसान महासभा), डॉ. आशिष मित्तल (अ.भा. किसान मजदूर सभा), डॉ. अशोक ढवळे (अखिल भारतीय किसान सभा), बी. वेंकट (अखिल भारतीय शेतमजूर युनियन), मेधा पाटकर (जनआंदोलनांचा राष्ट्रीय समन्वय), मा.आ. नरसय्या आडम (सीटू), आ. जयंत पाटील (शेतकरी सभा), मा.आ. विद्या चव्हाण (सेन्ट्रल व्हिस्टा विरोधी भारत), डॉ. अजित नवले (अखिल भारतीय किसान सभा), नामदेव गावडे (महाराष्ट्र किसान सभा), किशोर ढमाले (सत्यशोधक शेतकरी सभा), उल्का महाजन (सर्वहारा जन आंदोलन), शाम काळे (आयटक), देवानंद पवार (अ.भा. किसान कॉंग्रेस), अमरजित सिंह (गुरुद्वारा प्रबंधक समिती), फिरोज मिठीबोरवाला (हम भारत के लोग), राजेंद्र बावके (श्रमिक शेतकरी संघटना), विशाल हिवाळे (संविधान हक्क परिषद), मधु धोडी (कष्टकरी संघटना) आदी नेत्यांसह दिल्ली येथील शेतकरी आंदोलनातील सहभागानंतर मृत्युमुखी पडलेल्या महाराष्ट्रातील शहीद महिला कार्यकर्त्या सीताबाई तडवी यांचे पती रामदास तडवी उपस्थित होते.

महापंचायतीला उपस्थित असलेल्या 'संयुक्त किसान मोर्चा'च्या नेतृत्वाचे स्वागत शेतकरी सभेचे नेते आमदार जयंत पाटील यांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या काळातील पगडी देऊन केले.

महापंचायतीला संबोधित करताना सर्वच वक्त्यांनी कृषी कायदे रद्द करण्याबरोबरच शेतमालाला हमीभाव मिळण्यासह, शेतकऱ्यांच्या इतर महत्त्वपूर्ण मागण्यांसह वीज दुरुस्ती विधेयक व कामगारविरोधी श्रम संहिता मागे घेतल्याशिवाय आंदोलन संपणार नसल्याची घोषणा केली. यावेळी मोदी सरकारच्या देशबुडव्या, कॉर्पोरेटधार्जिण्या खासगीकरणाच्या धोरणांवर सर्वच वक्त्यांनी घणाघाती टीका केली.

कार्यक्रमाच्या शेवटी शेतकरी आंदोलनातील शहिदांना दोन मिनिटे उभे राहून मौन पाळून आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर राष्ट्रगीताचे गायन होऊन शेतकरी-कामगारांच्या जोरदार घोषणांनी महापंचायतीची सांगता झाली.

**(पान २८ पहा)**

# पीक विमा प्रश्नी पुणे येथील कृषी आयुक्त कार्यालयावर किसान सभेचा जोरदार मोर्चा

अॅड. अजय बुरांडे

शेतकऱ्यांच्या पीक विम्याबाबत असलेल्या विविध समस्यांत राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करून त्या सोडवाव्यात या मागणीसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने पुणे येथील कृषी आयुक्त कार्यालयावर ३० ऑगस्ट २०२१ रोजी भव्य मोर्चा काढण्यात आला.

सन २०२० साली परतीच्या पावसाने राज्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले. पीक विमा कंपन्या शेतकऱ्यांच्या या नुकसानाची भरपाई करतील असे आश्वासन त्यावेळी सत्ताधारी पक्षातील लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांना दिले होते. प्रत्यक्षात मात्र केवळ मूठभर शेतकऱ्यांनाच नुकसानाची भरपाई देण्यात आली. शेतकऱ्यांनी नुकसानाची लेखी तक्रार पीक विमा कंपन्यांकडे केली नाही. असे कारण देऊन राज्यभरातील लाखो शेतकऱ्यांना पिकाच्या नुकसानभरपाई पासून पीक विमा कंपन्यांनी वंचित ठेवले आहे.

राज्य सरकारांनी पीक विमा कंपन्यांबरोबर केलेल्या करारानुसार आपत्तीच्या वेळी शेतकऱ्यांनी कंपन्यांकडे लेखी अर्ज करणे अपेक्षित आहे. मात्र परिमंडळात ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झाले असल्यास संपूर्ण परिमंडळातील शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई देणे अपेक्षित होते. शासकीय यंत्रणेतील अधिकाऱ्यांनीही शेतकऱ्यांना तसेच मार्गदर्शन केले होते. त्यामुळे बहुसंख्य शेतकऱ्यांनी पीक विमा कंपन्यांकडे लेखी तक्रारी केल्या नाहीत. आता मात्र प्रशासनातील हे अधिकारी हात वर करून मोकळे झाले आहेत व विमा कंपन्यांनी नियमावर बोट ठेवत शेतकऱ्यांना नुकसानभरपाई पासून वंचित ठेवले आहे. किसान सभेने शेतकऱ्यांच्या या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवला, जिल्हा स्तरावर सातत्याने आंदोलने केली, मात्र प्रश्न सुटला नाही. त्यामुळे राज्य स्तरावर या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी पुणे येथील आयुक्त कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात आला.

सन २०२० साली परतीच्या पावसाने नुकसान झालेल्या पिकांचे महसूल विभागाने केलेले पंचनामे गृहीत धरून सर्व शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ द्या, पीक विमा योजनेतील जाचक अटी रद्द करा, नुकसान निश्चितीसाठी पीक कापणी प्रयोगांची संख्या वाढवा, पीक विमा योजनेसाठी गाव हा एकक धरून योजनेची अंमलबजावणी करा, पीक विमा योजना कंपन्यांना नव्हे, तर शेतकऱ्यांना लाभदायी ठरेल अशा प्रकारे पुनर्रचित करा, आदी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

२०२० साली पावसाने नुकसान झालेल्या व भरपाई नाकारण्यात आलेल्या शेतकऱ्यांमध्ये सर्वाधिक अन्याय बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर झाला असल्याने या मोर्चात बीड जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या व्यतिरिक्त परभणी, औरंगाबाद, जालना, लातूर या मराठवाड्यातील आणि अमरावती व बुलडाणा या विदर्भातील जिल्ह्यांमधूनही मोठ्या संख्येने शेतकरी मोर्चासाठी उपस्थित होते. सांगली, सातारा, अहमदनगर, पुणे व पालघर या जिल्ह्यांमधूनही शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते.

यावेळी महाराष्ट्राचे कृषी आयुक्त श्री. धीरज कुमार यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत कृषी आयुक्तांबरोबर किसान सभेची सविस्तर व चांगली चर्चा झाली. त्यांनी मोर्चाच्या सर्व मागण्यांशी सहमती व्यक्त केली. पीक विमा संदर्भात मंत्रालय स्तरावर कृषिमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये तातडीने बैठक लावावी व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवावेत असा निर्णय होऊन बुधवार, दि. १ सप्टेंबर २०२१ रोजी कृषी मंत्री ना. श्री. दादा भुसे यांच्यासोबत ही बैठक ठरली.

दिल्लीतील ऐतिहासिक शेतकरी आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा देणारा आणि हरियाणातील भाजप सरकारने शेतकऱ्यांवर केलेल्या अमानुष लाठीहल्ल्यात एका शेतकऱ्याचा जीव गेला, त्याचा तीव्र निषेध करणारा ठराव या मोर्चाने एकमताने मंजूर केला.

अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे, राज्य अध्यक्ष किसन गुजर, राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले, राज्य कोषाध्यक्ष उमेश देशमुख यांच्यासह सीटूचे राज्य सचिव आमदार विनोद निकोले, किसान सभेचे नेते अॅड. अजय बुरांडे, मुरलीधर नागरगोजे, मोहन लांब, दत्ता डाके, डॉ. अमोल वाघमारे, दिपक लिपणे, गोविंद आर्दड, अॅड. भगवान भोजने, जितेंद्र चोपडे, महादेव गारपवार, दिगंबर कांबळे, माणिक अवघडे, चंद्रकांत घोरखाना, सीटूचे नेते अजित अभ्यंकर, डॉ. महारुद्र डाके, डॉ. ज्ञानेश्वर मोटे आदींनी शेतकऱ्यांचे आंदोलन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले व आंदोलनाचे नेतृत्व केले.

ठरल्याप्रमाणे १ सप्टेंबरला डॉ. अजित नवले, अॅड. अजय बुरांडे, मुरलीधर नागरगोजे आणि जितेंद्र चोपडे यांचे शिष्टमंडळ कृषी मंत्री दादा भुसे यांना मुंबईत भेटले. मंत्र्यांनी किसान सभेच्या मागण्या मान्य करत पुढील निर्देश दिले आहेत: २०२०च्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण आणि पंचनामे राज्य सरकारने राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीच्या मार्गदर्शक सूत्रांनुसार यापूर्वीच केले असून त्यानुसार शेतकरी नुकसानभरपाईकरता पात्र असल्याचा निर्णय राज्य सरकारने दिला आहे. राज्य सरकार संबंधित विमा कंपन्यांनी शेतकऱ्यांना संपूर्ण नुकसानभरपाई द्यावी, असा आदेश देईल. ज्या विमा कंपन्या हा आदेश पाळणार नाहीत, त्यांचे राज्य सरकारतर्फे दिले जाणारे पुढील प्रीमियम्स थांबवण्यात येतील. या प्रक्रियेत केंद्र सरकार अडथळे आणत असल्यामुळे राज्य सरकार हा मुद्दा केंद्राकडे आक्रमकपणे लावून धरेल.

कृषी मंत्र्यांनी दिलेले हे आश्वासन स्वागतार्ह असले तरी प्रत्यक्षात सर्व शेतकऱ्यांच्या हातात नुकसानभरपाईची रक्कम पडेपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार महाराष्ट्र राज्य किसान सभेने केला आहे.

किसान सभेच्या या आंदोलनाला राज्यातील वृत्तपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक मिडियात उत्तम प्रसिद्धी मिळाली.

## पीक विम्यासाठी किसान सभेतर्फे बीड जिल्ह्यात आंदोलन

बीड जिल्ह्यामध्ये किसान सभेतर्फे गेल्या अनेक महिन्यांपासून पीक विमा संदर्भात वेगवेगळ्या तालुक्यांमध्ये आंदोलन होत आहे. २०१८ ते २०२० या वर्षातील बीड जिल्ह्याच्या शेतकऱ्यांच्या खरिपाच्या पीक विम्याचा प्रश्न ऐरणीवर आणण्याचे काम महाराष्ट्र राज्य किसान सभेची बीड जिल्हा कमिटी सातत्याने करत आहे.

नोव्हेंबर २०२१मध्ये 'दिवाळी सरकारच्या दारी' हे अभिनव आंदोलन बीड जिल्ह्यात किसान सभेने केले. महाराष्ट्राचे कृषी आयुक्त, महाराष्ट्राचे कृषिमंत्री, विमा कंपन्यांचे अधिकारी यांच्यासोबत वेळोवेळी या प्रश्नावर चर्चा झाल्या; परंतु २०२० मधील खरिपाच्या पीक विम्याचा प्रश्न अद्यापही प्रलंबित आहे. हा प्रश्न धसाला लावण्यासाठी केंद्रीय कृषी सचिव यांना निवेदन देऊन प्रश्न सोडवण्यासाठी किसान सभा कसून प्रयत्न करीत आहे.

पीक विम्याच्या मुद्यावर जिल्ह्यातील शेतकरी अत्यंत आग्रहशील असून, जोरदार आंदोलन करून पीक विमा मिळविणारच असा त्यांचा निर्धार आहे. १७ जानेवारी २०२२ रोजी जिल्ह्यातील परळी, माजलगाव, धारूर, अंबाजोगाई आणि वडवणी या तालुक्यांमध्ये तहसील कार्यालयाला घेराव घालण्याचे आवाहन किसान सभेतर्फे करण्यात आले होते. परंतु सध्या वाढणाऱ्या कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर या आंदोलनाला प्रशासनाने परवानगी नाकारली. तरीही किसान सभेने शांत न बसता परळी, माजलगाव, धारूर, अंबाजोगाई, आणि वडवणी या ठिकाणी तहसीलदारांना निवेदन दिले.

परळी येथे ॲड. अजय बुरांडे, पांडुरंग राठोड, गंगाधर पोटभरे, विशाल देशमुख, किरण सावजी, रुस्तम माने, माजलगाव मेथे दत्ता डाके, मोहन जाधव, सुहास झोडगे, वडवणी येथे ओम पुरी, जगदीश फरताडे, लहू खारगे, अंबाजोगाई येथे प्रशांत मस्के, सुहास चंदनशिव, धारूर येथे मोहन लांब, काशिराम शिरसाट, दादा शिरसाट, अशोक थोरात, बीड येथे रोहिदास जाधव, सुहास जायभाये, खेत्रे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन सादर केले. तहसीलदारांना सादर करण्यात आलेल्या निवेदनात तालुक्यातल्या स्थानिक मागण्यांचाही समावेश करण्यात आला.

मार्च २०२२ मध्ये किसान सभेच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्याच्या अनेक तालुक्यांत पीक विमा प्रश्नावर पुन्हा एकदा जोरदार मोर्चे काढण्यात आले. हा प्रश्न सुटे पर्यंत लढा चालूच ठेवण्याचा निर्धार बीड जिल्हा किसान सभेने केला आहे.

★★★

**(दिल्लीतील शेतकरी ...पान २४ वरून)**

मोर्चा अडविल्याने तेथील रस्त्यावरच आंदोलकांनी ठिय्या मांडला व आंदोलन सुरू केले. पोलिसांनी मोर्चाच्या नेत्यांना राज्यपाल भवनावर निवेदन देण्यासाठी येण्याची विनंती करून त्यासाठी वाहनांची सोय केली असल्याचे सांगितले. परंतु राज्यपाल नसतील तर निवेदन आम्ही देणार नाही असे सांगून त्यांनी निवेदन देण्यास नकार दिला.

मोर्चासमोर असलेल्या वाहनावरच सभा सुरू होऊन नेत्यांची भाषणे सुरु झाली. डॉ. अशोक ढवळे यांनी राज्यपाल अगोदर कळवूनही शेतकरी-कामगारांच्या भेटीस हजर नसल्याचा जाहीर निषेध करून, राज्यपालांना देण्यात येणारे निवेदन त्यांना न देता ते फाडून टाकण्याचे जाहीर केले. नेत्यांनी त्या निवेदनाची प्रत फाडून भिरकावून दिली व राज्यपालांचा जाहीर निषेध केला. हे निवेदन राष्ट्रपतींना पाठवण्याचा निर्णय डॉ. अशोक ढवळे यांनी जाहीर केल्यानंतर ही सभा उत्साहात संपली. सभा संपल्यानंतर आंदोलक आझाद मैदानात परतले व त्यांनी महामुक्कामाला पुन्हा सुरुवात केली.

## प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणाने आंदोलनाची सांगता

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी आझाद मैदानावरील महामुक्कामाच्या ठिकाणी ध्वजारोहण करून आंदोलनाची सांगता करण्यात आली. नाशिक जिल्ह्यातील दुड्गाव येथील अखिल भारतीय किसान सभेच्या ७३ वर्षांच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या यमुनाबाई जाधव यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. दोन वर्षांपूर्वीच्या किसान लाँग मार्च मध्ये नाशिक ते मुंबई हे २०० किलोमीटरचे अंतर त्या स्वतः चालल्या होत्या. यावेळी विधान सभेचे अध्यक्ष मा. नाना पटोले यांची उपस्थिती उल्लेखनीय होती. संविधानिक पद असूनही शेतकरी म्हणून या कार्यक्रमाला उपस्थित असल्याचे त्यांनी याप्रसंगी गौरवाने सांगितले. 'संयुक्त शेतकरी कामगार मोर्चा'चे सर्व नेते या कार्यक्रमास उपस्थित होते.

ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत गायल्यावर, 'भारतीय धर्मनिरपेक्ष लोकशाही प्रजासत्ताक चिरायू होवो!', 'भारतीय संविधानाचा विजय असो!', 'इन्कलाब जिंदाबाद', अशा घोषणांनी आझाद मैदान दुमदुमून गेले. यानंतर या अत्यंत प्रभावी महामुक्काम आंदोलनाची सांगता झाली.

★★★

**(मोदी सरकारच्या....पान २६ वरून)**

## लखीमपूर खेरी येथील शहिदांच्या अस्थींचे विसर्जन

लखीमपूर खेरी येथे भाजपच्या गुंडांकडून झालेल्या हल्ल्यातील शहिदांच्या अस्थींचे विसर्जन महापंचायत झाल्यानंतर मुंबईच्या गेटवे ऑफ इंडिया जवळ अरबी समुद्रात करण्यात आले. शेतकरी सभेचे नेते आमदार जयंत पाटील यांनी त्याचे काटेकोर नियोजन केले होते. लाल बावटे डौलाने फडकणाऱ्या बोटींमधून हे अस्थिकलश समुद्रात नेऊन त्यांना भावपूर्ण मानवंदनेने समुद्रात विसर्जित करण्यात आले. यावेळी संयुक्त किसान मोर्चाचे नेते उपस्थित होते.

महापंचायत यशस्वी करण्यासाठी 'संयुक्त शेतकरी कामगार मोर्चा'त सहभागी सर्व संघटनांनी जोरदार परिश्रम घेतले. मुंबईतील कार्यकर्त्यांचा संच डॉ. एस. के. रेगे, शैलेंद्र कांबळे, ॲड. राजू कोरडे, प्रकाश रेड्डी, मिलिंद रानडे, विद्या चव्हाण, फिरोज मिठीबोरवाला, विशाल हिवाळे इत्यादींनी खूप परिश्रम घेऊन महापंचायतीची उत्तम व्यवस्था ठेवली होती. नवी मुंबईतील गुरुद्वारांच्या शीख बांधवांनी महापंचायतीला उपस्थित असलेल्या हजारोना अल्पोपहार, चहा, पाणी व भोजन विनामोबदला वितरित केले.

★★★

# हैद्राबाद येथील अखिल भारतीय किसान कौन्सिलची हाक: २८-२९ मार्चला ग्रामीण भारत बंद यशस्वी करा! किसान सभेची संघटना मजबूत व रेखीव करा!

**सिध्दप्पा कलशेट्टी**






किसान सभेच्या अखिल भारतीय कौन्सिलची बैठक नुकतीच १०-११ जानेवारी २०२२ रोजी तेलंगणची राजधानी हैदराबाद येथील कॉ. पी. सुंदरय्या विज्ञान केंद्रात पार पडली. नोव्हेंबर-डिसेंबर २०२१च्या देशव्यापी किसान आंदोलनाच्या ऐतिहासिक विजयानंतर झालेली किसान कौन्सिलची ही पहिलीच बैठक होती. सबंध बैठकीत या विजयाचा उत्साह भरला होता. बैठकीला १७ राज्यांतील किसान सभेचे नेते उपस्थित होते. महाराष्ट्रातून किसन गुजर, अर्जुन आडे, सिद्धप्पा कलशेट्टी, सुभाष चौधरी व रडका कलांगडा हे हजर होते. कोरोना महामारीतील अडचणींमुळे काही राज्ये येऊ शकली नाहीत.

येत्या महत्त्वपूर्ण राज्य विधानसभा निवडणुकीत भाजपचा पराभव करण्यासाठी आपली सर्व शक्ती पणाला लावण्याचे; २८-२९ मार्चचा देशव्यापी सार्वत्रिक संप आणि ग्रामीण बंद पूर्णपणे यशस्वी करण्याचे; आणि किसान आंदोलनाच्या विजयामुळे निर्माण झालेल्या उत्साही वातावरणात देशभरात किसान सभा मजबूत आणि रेखीव करण्याचे आवाहन या कौन्सिल बैठकीने केले.

१० जानेवारी रोजी किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन बैठकीला सुरुवात झाली. राष्ट्रीय सहसचिव एन. के. शुक्ला यांनी दिवंगत नेते, शेतकरी संघर्षातील ७१५ हुतात्मे आणि इतर शहीदांना श्रद्धांजली अर्पण करणारा शोकठराव मांडला.

## अध्यक्षीय भाषण आणि सरचिटणीसांचा अहवाल

आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. अशोक ढवळे यांनी या किसान आंदोलनात प्रशंसनीय भूमिका बजावून तिन्ही काळे कृषी कायदे रद्द करण्यात यश मिळवल्याबद्दल सर्व कौन्सिल सदस्यांचे, संपूर्ण किसान सभेचे, भ्रातृभावी संघटनांचे आणि समग्र भारतीय जनतेचे अभिनंदन केले. या लढ्याचे आणि त्यातील विजयाचे राजकीय महत्त्व समजावून सांगितल्यानंतर त्यांनी शेतकरी चळवळीसमोरील आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय आव्हानांचा आढावा घेतला. विशेषतः आंतरराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेच्या नेतृत्वाखालील साम्राज्यवादाची घृणास्पद भूमिका आणि राष्ट्रीय स्तरावर भाजप-आरएसएस सरकार आणि त्याची कॉर्पोरेट धर्मांधता आणि हुकूमशाहीचा गंभीर धोका यावर त्यांनी प्रहार केला. केरळच्या डाव्या लोकशाही आघाडीच्या सरकारने केलेल्या उत्कृष्ट कामाला आणि पर्यायी धोरणांना 'देशावरील काळ्या ढगांना लाभलेल्या चंदेरी किनारी'ची उपमा देत त्यांनी किसान सभेसमोर भविष्यातील राजकीय कार्यांची रूपरेषा सांगून आपल्या अध्यक्षीय भाषणाचा समारोप केला.

किसान सभेचे राष्ट्रीय सरचिटणीस हन्नन मोल्ला यांनी सरचिटणीसांचा अहवाल चार विभागांमध्ये मांडला: १. भारतातील कृषी परिस्थिती; २. शेतकऱ्यांचा ऐतिहासिक संघर्ष आणि त्याचा विजय; ३. संघटनात्मक परिस्थिती; आणि ४. भविष्यातील कार्ये. त्यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीला किसान सभा, संयुक्त किसान मोर्चातील शेतकऱ्यांच्या इतर सर्व संघटना, केंद्रीय कामगार संघटनांचे संयुक्त व्यासपीठ, शेतमजूर, महिला, विद्यार्थी, युवा यांच्या संघटना आणि देशातील जनतेचे किसान आंदोलनाच्या विजयाबद्दल अभिनंदन केले. ते म्हणाले की, वाढत्या शेतकरी आत्महत्या, देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना योग्य हमीभाव नाकारणे, खतांच्या तुटवड्यामुळे होणारा काळाबाजार, नैसर्गिक आपत्ती, कीटक आणि वन्य प्राण्यांमुळे पिकांचे मोठे नुकसान, तसेच वाढती उपासमार यामुळे देशातील कृषी

परिस्थिती गंभीर बनली आहे. किसान सभेचे केंद्र आणि सर्व राज्य युनिट्सनी सातत्याने घेतलेल्या सक्रिय सहभागासकट शेतकरी संघर्षाच्या विविध पैलूंवर त्यांनी भर दिला. त्यांनी प्रत्येक राज्यातील शेतकऱ्यांच्या ज्वलंत समस्यांवर संयुक्त आणि स्वतंत्र लढ्यांवर लक्ष केंद्रित करण्यावर भर दिला. डिसेंबर २०२२ या महिन्यात केरळमध्ये होणाऱ्या किसान सभेच्या ३५व्या अखिल भारतीय अधिवेशनापर्यंतच्या येत्या एका वर्षात किसान सभेचे मोठ्या प्रमाणावर दृढीकरण, विस्तार, मजबुतीकरण आणि संघटनेचे कार्य रेखीव करण्याचे आवाहन केले.

सरचिटणीसांच्या अहवालावर झालेल्या चार तासांच्या उत्कृष्ट चर्चेत सर्व १७ राज्यांतील २९ सदस्यांनी भाग घेतला. त्यात प्रामुख्याने केरळ राज्य सरकारचे अर्थमंत्री आणि केरळ किसान सभेचे माजी राज्य सरचिटणीस के. एन. बालगोपाल यांचा समावेश होता. इतर सर्व वक्त्यांनी या किसान आंदोलनाच्या एका वर्षात स्वतंत्र आणि संयुक्तपणे केलेल्या कामाची अनेक प्रेरणादायी उदाहरणे मांडताना किसान सभेच्या केंद्राच्या सक्रिय कार्याचेही कौतुक केले. त्यामुळेच 'एसकेएम'च्या ९ सदस्यीय समितीमध्ये आणि ५ सदस्यीय समितीमध्ये किसान सभेला प्रतिनिधित्व मिळाले. सर्वांनी आपले संघर्ष वाढवण्याचा आणि आगामी काळात संघटनेचे सर्व पैलू बळकट करण्याचा निर्धार केला. ११ जानेवारी रोजी सरचिटणीसांनी चर्चेला उत्तर दिल्यानंतर अहवाल एकमताने मंजूर झाला.

## ठराव आणि भविष्यातील कार्ये

राष्ट्रीय सहसचिव विजू कृष्णन यांनी पुढील ठराव मांडले: आगामी विधानसभा निवडणुकीत धर्मांध, शेतकरीविरोधी, कामगारविरोधी भाजपचा पराभव करा; २८–२९ मार्च रोजी होणारा देशव्यापी सार्वत्रिक संप आणि ग्रामीण बंद संपूर्णपणे यशस्वी करा; धर्मांध ध्रुवीकरणाचे देशद्रोही आणि गुन्हेगारी प्रयत्न हाणून पाडा; नैसर्गिक आपत्ती आणि इतर कारणांमुळे पिकांच्या होणाऱ्या नुकसानाची भरपाई ; गुरांचा व्यापार आणि वाहतूक बंदीच्या विरोधात; आणि केरळमधील 'के रेल' प्रकल्प.

राष्ट्रीय कोषाध्यक्ष पी. कृष्णप्रसाद यांनी किसान सभेपुढील भविष्यातील कार्ये आणि संघटनेचा हिशोब मांडला. वरील ठरावांमध्ये नमूद केलेल्या कार्यांव्यतिरिक्त मुख्य कार्य म्हणजे पुढील दोन महिन्यांत देशभरातील एक लाख गावांमध्ये जाहीर सभा घेऊन शेतकरी संघर्षाच्या विजयाचे महत्त्व जनतेला समजावून सांगणे आणि रास्त हमीभावाला कायदेशीर हमी, कर्जमाफी, पंतप्रधान पीक विमा योजनेत आमूलाग्र शेतकरीधार्जिणे बदल, कर्ज, सिंचन, वीज, मनरेगा आणि सार्वजनिक वितरण प्रणालीचा विस्तार, वनाधिकार आणि पेसा यांची कठोर अंमलबजावणी आणि जमिनीशी संबंधित महत्त्वाचे मुद्दे या उर्वरित मागण्यांवर लक्ष केंद्रित करणे. किसान सभेच्या स्वतंत्र लढ्यांवर लक्ष केंद्रित करतानाच देशभरातील संघर्षासाठी एसकेएम, एआयकेएससीसी आणि भूमी अधिकार आंदोलन यांची एकता मजबूत करणे हे दुसरे प्रमुख कार्य आहे.

ज्या मुख्य संघटनात्मक कार्यांचा निर्णय घेण्यात आला ते असे : यंदाची सभासद नोंदणी मोहीम मोठ्या प्रमाणात पूर्ण करणे; डिसेंबर २०२२ मध्ये केरळमधील अखिल भारतीय अधिवेशनापूर्वी प्रत्येक राज्यातील सर्व प्राथमिक युनिट्सच्या नोंदणीसह हजारो गाव अधिवेशनांची पूर्तता; विभागापासून ते राज्य स्तरापर्यंत रीतसर अधिवेशनांद्वारे संपूर्ण संघटना सुव्यवस्थित करणे; सर्व स्तरांवर तरुण आणि महिला कार्यकर्त्यांची नियुक्ती आणि बढती देण्यासाठी विशेष लक्ष देणे; सर्व स्तरांवर कार्यकर्त्यांच्या वार्षिक आणि पद्धतशीर राजकीय शिक्षणाची योजना करणे; पीकनिहाय उपसमितींचे काम नियमित करणे; किसान सभेच्या पूर्णवेळ कार्यकर्त्यांची संपूर्ण यादी व तपशील तयार करून तो केंद्राला सादर करणे; पी. सुंदरय्या ट्रस्टचे कार्य मजबूत आणि विस्तारित करणे; 'पेझंट स्ट्रगल' आणि 'किसान संघर्ष' या किसान सभेच्या केंद्रीय मुखपत्रांचे प्रकाशन नियमित करणे; मार्च २०२२ मध्ये कृषी धोरणाच्या पर्यायांवर अखिल भारतीय परिसंवाद आयोजित करणे; किसान सभेची अखिल भारतीय आणि राज्य केंद्रे बळकट करणे; किसान सभा, शेतमजूर युनियन व सीटू यांच्यात सर्व स्तरांवर कामगार–शेतकरी ऐक्य निर्माण करण्याच्या दिशेने समन्वय मजबूत करणे; नवी दिल्लीत किसान सभेच्या केंद्रीय कार्यालयाच्या बांधकामाची प्रक्रिया वेगवान करणे; देशव्यापी किसान संघर्ष निधीवर निर्णय घेऊन त्याची अंमलबजावणी करणे; आणि सर्व राज्य युनिट्सचे हिशोब सुव्यवस्थित करणे.

सर्व ठराव, भविष्यातील कार्ये आणि हिशोब एकमताने मंजूर झाले.

किसान सभेच्या तेलंगण राज्य कमिटीने प्रकाशित केलेल्या हन्नन मोल्ला यांच्या, 'अखिल भारतीय किसान सभेचा संक्षिप्त इतिहास' या पुस्तकाच्या तेलगू आवृत्तीचे प्रकाशन डॉ. अशोक ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. किसान सभा केंद्राद्वारे प्रकाशित होणारा किसान आंदोलनाच्या विजयावरील 'पेझंट स्ट्रगल' चा ताजा विशेषांक आणि जुलै २०२१ मध्ये झालेल्या किसान कौन्सिलच्या ऑनलाइन बैठकीचे दस्तऐवज देखील या बैठकीत प्रसिद्ध करण्यात आले. या बैठकीची उत्कृष्ट व्यवस्था केल्याबद्दल तेलंगण किसान सभेचे नेतृत्व आणि स्वयंसेवकांचे अभिनंदन आणि आभार मानल्यानंतर जोरदार घोषणांनी बैठकीची सांगता झाली,

११ जानेवारी रोजी दुपारी भरगच्च पत्रकार परिषद आणि संध्याकाळी ऑनलाइन जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. तेलंगण किसान सभेचे अध्यक्ष पी. जंगीरेड्डी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या जाहीर सभेला हन्नन मोल्ला, डॉ. अशोक ढवळे आणि तेलंगण राज्य सरचिटणीस टी. सागर यांनी संबोधित केले.

★★★

**२८–२९ मार्च २०२२चा देशव्यापी संप आणि ग्रामीण भारत बंद जबरदस्त यशस्वी करा!**

# लखीमपूर खेरी येथील शहीद कलश यात्रा
# शेतकरी हुतात्म्यांना राज्यातील विविध जिल्ह्यांत आदरांजली



जालना, जि. जालना




परतूर, जि. जालना



औरंगाबाद, जि. औरंगाबाद




पैठण, जि. औरंगाबाद



भोकर, जि. नांदेड



सारखणी, जि. नांदेड



वणी, जि. यवतमाळ



मारेगाव, जि. यवतमाळ

# लखीमपूर खेरी येथील शहीद कलश यात्रा शेतकरी हुतात्म्यांना राज्यातील विविध जिल्ह्यांत आदरांजली



नागपूर, जि. नागपूर



वर्धा, जि. वर्धा



अमरावती, जि. अमरावती



नांदगाव खंडेश्वर, जि. अमरावती



खामगाव, जि. बुलडाणा



प्रकाशा, जि. नंदुरबार



नाशिक, जि. नाशिक



चांदवड, जि. नाशिक

# लखीमपूर खेरी येथील शहीद कलश यात्रा
# शेतकरी हुतात्म्यांना राज्यातील विविध जिल्ह्यांत आदरांजली



अकोले, जि. अहमदनगर



उरण, जि. रायगड



शहापूर, जि. ठाणे



बोईसर, जि. पालघर



वाडा, जि. पालघर



जव्हार, जि. पालघर






शहिदांच्या अस्थि मुंबई जवळील अरबी समुद्रात विसर्जित

# ११ डिसेंबर २०२१ : ऐतिहासिक किसान आंदोलनाचा देशभर विजयोत्सव



शहाजहाँपूर बॉर्डर, राजस्थान



टिकरी बॉर्डर, हरियाणा



बेळगांव, कर्नाटक




सीतामढी, बिहार




रांची, झारखंड




राजकोट, गुजरात




इटावा, उत्तर प्रदेश



विजयवाडा, आंध्र प्रदेश

# ऑगस्ट २०२१ : पीक विमा प्रश्नी पुणे येथे कृषी आयुक्त कार्यालयावर किसान सभेचा जोरदार मोर्चा




मोर्चास संबोधित करताना अ.भा. किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. अशोक ढवळे



मोर्चास संबोधित करताना अ.भा. किसान सभेचे राज्य अध्यक्ष किसन गुजर




मोर्चास संबोधित करताना अ.भा. किसान सभेचे राज्य सरचिटणीस डॉ. अजित नवले




मोर्चास संबोधित करताना सीटूचे राज्य सचिव आमदार विनोद निकोले




मोर्चास संबोधित करताना अ.भा. किसान सभेचे बीड जिल्ह्याचे नेते ॲड. अजय बुरांडे



मोर्चास उपस्थित राज्यभरातून आलेले पीक विमाधारक शेतकरी



मोर्चाच्या वतीने राज्य कृषी आयुक्तांना निवेदन देताना किसान सभेचे शिष्टमंडळ



शिष्टमंडळासोबत कृषी आयुक्तांची सकारात्मक चर्चा

# २८ नोव्हेंबर २०२१ : मोदी सरकारच्या कॉर्पोरेटधार्जिण्या धोरणांना नेस्तनाबूत केल्याशिवाय संघर्ष थांबणार नाही! मुंबईच्या विराट शेतकरी-कामगार महापंचायतीत एल्गार!














हे त्रैमासिक मुद्रक–प्रकाशक गुजर किसन शेनफडू यांनी महाराष्ट्र राज्य किसान सभेच्या महाराष्ट्र राज्य समितीसाठी कन्सेप्ट प्लस, ६ साहील पार्क, वनविहार कॉलनी, नाशिक – ४२२ ००७ येथे छापून ८, माया बिल्डिंग, पहिला मजला, लोकसहकार नगर, पंचवटी, नाशिक – ४२२००३ येथे प्रकाशित केले. संपादक : गुजर किसन शेनफडू – ई–मेल : kisansangharsh2014@gmail.com